बिटिश राजवटीच्या काळामध्ये सन १८६७ साली The Press & Registration of Book Act वृत्तपत्र आणि पुस्तक नोंदणी कायदा करण्यात आला. या कायद्यांतर्गत देशातून निघणाऱ्या वृत्तपत्राची व पुस्तकांची नोंदी एकत्रितपणे सरकारी दप्तरी रहावी. या उद्देशाने या कायद्याची निर्मिती करण्यात येऊ लागली. या कायद्याने पुस्तकावर मुद्रकाचे नाव, मुद्रित स्थळ, त्याचप्रमाणे प्रकाशकाचे नाव व प्रकाशनाचे स्थळ स्पष्टपणे नोंदवणे आवश्यक आहे. पुस्तकावरील तपशील देण्यामागे त्यातील लेखन किंवा इतर बाब जर कायद्याच्या भंग करणारी असेल तर अशा बेकायदेशीर व दंडणीय लेखनाची जबाबदारी कोणाकोणाची आहे हे समजते. अशा हेतूने या कायद्याची निर्मिती करण्यात आली आहे. या कायद्याची निर्मिती करत असताना वेळोवेळी बदल करण्यात आले आहे.

ब्रिटिश शासन व्यवस्थेने शासकीय माहितीची गुप्तता राखण्याच्या दृष्टीने सोईस्कर व्हावे यासाठी सन १९२३ साली गोपनीय माहिती किंवा गोपनीय कागदपत्र कायदा करण्यात आला. या कायद्याची व्याख्या करण्यात आली नाही. त्यामुळे कोणती माहिती गोपनीय ठरवायची ते सर्वस्वी शासनाच्या आधीन असते. अशी माहिती दुसर्यास देणे व मिळवणे या दोन्ही कृती गुन्हा समजल्या जातात. त्यामुळे शासनाकडून अधिकृतरित्या प्राप्त न झालेली माहिती वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्यास वृत्तपत्रावरच्या कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येऊ शकते. या कायद्यामुळे लोकशाही शासन व्यवस्थेत पारदर्शकता आणता येऊ शकत नाही. या कायद्यामुळे वृत्तपत्रामधील शासकीय माहितीच्या प्रसारणात अडथळे निर्माण होतात.

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर पत्रकारिता कायद्याचे स्वरूप संविधानाच्या कायदेशीर चौकटीमध्ये याची निर्मिती करण्यात आली. भारतीय संविधानाने मुलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे यांची निर्मिती केली आहे. यामध्ये संविधानाच्या कलम १९(२) नुसार भाषण स्वातंत्र्य वाजवी बंधने घालता येतात. भारताचे सार्वभौमत्व व एकात्मता, राष्ट्रीय सुरक्षितता, सन्दिरुची, नैतिकता, न्यायालयाचा अवमान, बदनामी किंवा गुन्हा करण्यास प्रोत्साहन देणे या संदर्भातच कायदेमंडळाना स्वातंत्र्य वाजवी बंधन घालता येते. हे घातलेली बंधने वाजवी आहे का अवाजवी आहे हे न्यायालय ठरवते. वृत्तपत्रसंस्था हा एक प्रकारचा उद्योग असल्याने त्यांच्या व्यवसाय स्वातंत्र्यावरती बंधने घालता येतात.

वृत्तपत्राच्या आक्षेपार्ह जाहिरातीचा कायदा करण्यात आला आहे. सन १९५४ साली ग्राहक संरक्षण कायदा आणि मक्तेदारीच कायदा करण्यात आला. या कायद्यांतर्गत ग्राहकाच्या हिताच्या दृष्टीने कारवाई करता येते. वृत्तपत्राच्या उत्पादनाचे साधन आहे असे असले तरी कोणत्या जाहिराती प्रसिद्ध करावयाच्या व कोणत्या करावयाच्या नाहीत याबाबत वृत्तपत्र स्वत: निर्णय घेत असतात. तसेच कायद्याच्या नुसार जाहिरातीवरती बंधन निर्माण करता येतात. तसेच फसवणुक करणाऱ्या कायद्यावरती बंदी आणता येते. एखाद्या गंभीर आजारावरती औषधपचार पद्धतीच्या फसवणूक जाहिरातीवरती कारवाई करता येते. या जाहिरात देणाऱ्या बरोबर ती छपाई करणारे प्रकाशक यांच्यावरती कारवाई करता येते. एखाद्या आजारावरती इलाज करण्यासाठी मंत्र, ताईत, कवच, पदार्थ इ. इलाज बरा करता रोगनिदान करणे प्रतिबंध करणे, अव्हेत शक्ती आहे असे सांगून खोटी जाहिरात करण्यावरती कडक कार्यवाही या कायद्यांतर्गत दंडणीय कार्यवाही होते.

वृत्तपत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या पत्रकारानं साठी विशेष कायदा करण्यात आला आहे. सन १९५६ साली श्रमिक पत्रकार कायदा करण्यात आला आहे. या कायद्यांतर्गत सन १९५५ साली वृत्तपत्रामध्ये काम करणाऱ्या पत्रकारांच्या व अन्य कर्मचार्यांच्या सेवा शर्ती ठरवण्यासाठी या कायद्याची निर्मिती केली आहे. या कायद्यामध्ये कामाचे तास व रजा निश्चित करण्यात आल्या आहेत. वेतन निश्चित करण्यासाठी वेतनमंडळाची स्थापना करण्याची तरतुद केली आहे. या कायद्याने औद्योगिक विवाह अधिनियम १९४७ श्रमिक पत्रकारांना लागू करण्यात आला. तसेच औद्योगिक सेवायोजन अधिनियम १९४६ आणि कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी अधिनियम १९५२ हे अधिनियम करण्यात आले. श्रमिक पत्रकाराना आदान देण्याबाबतची तरतुद करण्यात आली.

पत्रकारावरती होणाऱ्या वाढत्या हल्ल्याचे प्रमाण अधिक आढळून आल्याने पत्रकारांच्या संरक्षणासाठी विशेष कायदा करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले. सन २०१९ मध्ये या कायद्याचा वापर करण्यात आले. गेल्या पाच वर्षात ३७३ पत्रकार आणि ५२ मिडिया होस्टवरती हल्ले झालेले आहेत. त्यापैकी एकावरही कायदेशीर कार्यवाही झाली नाही असे दिसते. या कायद्या स्वरूपामध्ये माध्यमांच्या कार्यालयाची तोडफोड केल्यास नुकसान भरपाई द्यावी लागणार, हल्ला करणाऱ्याला तीन वर्षे कारावास किंवा ५० हजार दंड अथवा दोन्ही. खोटी तक्रार करणाऱ्या पत्रकारावरदेखील सारखीच कारवाई, खोटी तक्रार असल्याचे सिद्ध झाल्यास कोणतीही शासकीय लाभ मिळणार नाही. अधिस्वीकृत रद्द, पोलीस उपअधिक्षक दर्जाच्या अधिकार्यामार्फत तपास, पत्रकारावरील हल्ले दखलपात्र व अजामीनपत्र असून आणि प्रथम वर्ग दंडाधिकारा यांच्या समोर चालवण्या येणार, नुकसान भरपाई व वैद्यकीय उपचाराला खर्च दिला नाही. तर ती शासकीय महसूल म्हणून वसूल करण्यात येईल. या कायद्यातील तरतुदीमुळे वृत्तपत्रसंस्था आणि पत्रकाराना कायदेशीर अधिकृत संरक्षण मिळवून देण्याचे कार्य कायद्याच्या माध्यमातून केले आहे त्याची अंमलबजावणी होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

पत्रकारिता क्षेत्र अधिक परिवर्तनशील आणि गतिशील होत आहे. त्याचे स्वरूप वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक आणि सामाजिक मिडीया इत्यादी माध्यमातून कार्यरत आहे. यामध्ये वृत्तसंस्था आणि पत्रकार यांच्या संरक्षणासाठी केंद्रीय आणि राज्य स्थरावरती विविध प्रकारचे कायदेशीर तरतुदी आणि त्यांची अंमलबजावणी करण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. त्यामुळे या दोन्ही घटकांना संरक्षात्मक स्तरावरती अधिक दिलासा मिळत आहे.

## १.९ सारांश (SUMMARY)

पत्रकारितेची व्याप्ती अदिक व्यापक आणि गुंतागुंतीची बनत आहे. जागतिकीकरण काळात प्रसार माध्यमांचा प्रगतशील विकास होत आहे. नवीन घडामोडीचा परिवर्तनाशी आणि विकासावरती कसा परिणाम होतो हे प्रसार माध्यमातून समजून घेता येते. हे बातमी, वृत्तलेख, विशेषलेख, अग्रलेख, पुरवणी, मनोरंजन, जाहिरात, क्रीडा, इत्यादी

माध्यमांतून पत्रकारिता समजून घेता येते. त्यामुळे नवीन माहिती देण्याचे काम केले जाते. जागतिक देशी प्रांतीय आणि स्थानिक घडामोडीची माहिती मिळते. या संदर्भातून पत्रकारितेच संकल्पनात्मक स्वरूप कार्य विकास कायदे समजून घेणे आवश्यक आहे. त्याचे नवे संदर्भ तपासून पाहण्यासाठी पत्रकारितेवरील दृष्टीक्षेप समजून घेणे आवश्यक आहे तरच पत्रकारितेचा सवंग साधता येईल.

## १.१० प्रश्न (QUESTIONS)

१) पत्रकारितेची व्याख्या सांगून स्वरूप व वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

२) पत्रकारितेची व्याप्ती

३) भारतातील पत्रकारितेच्या वरील दृष्टीक्षेप स्पष्ट करा.

४) पत्रकारितेचे कायदे

## १.११ संदर्भ ग्रंथ (REFERENCES)

1) BILL Kovach and Tom Rosenstiel (2001) The Elements of Journalisms, Three Rivers Press.

2) Robert Boyntion (2007) The Bew Journalism Knopf Doubleday Publication.

3) Aggarwal V.B. and Gupta vs. 2001 Handbook of Journalism and Mass Communication, concept Publishing Co.

4) Mehta D.S. 2014 Mass Communication and journalism in India. Allied Publishers P.V. New Delhi.

5) Robert Trager, Susan Dante Ross, AMY Reynolds 2018. The Law of Journalism and Mass Communication Sage Publication, New Delhi.

6) Ramela J. Creedon & Judith Cramer 2007, Women in Mass Comminication, Sage Publications U.K.

7) Keval J. Kumar 2010, Mass Communication in India, Jaico Publishing house, Delhi.

8) Hasan Seema 2010, Mass Communiation, Principles and Concepts, CBS Publication & Distribution, New Delhi.

❖❖❖❖



munotes.in

# २

# पत्रकारिता नितीमत्ता

# ETHICS OF JOURNALISM

**प्रकरणाची रचना :**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ पत्रकारिता नितीमत्तेची व्याख्या

२.३ पत्रकारिता नितीतत्वाचे मुल्य

२.४ पत्रकारिता नितीतत्वाचे घटक

२.५ पत्रकारितेवरील नितीमत्ता

२.६ पत्रकारांची जबाबदारी आणि कर्तव्य

२.७ सारांश

२.८ प्रश्न

२.९ संदर्भ साहित्य


## २.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

- पत्रकारिता नितीतत्व ही संकल्पना समजून घेणे.
- पत्रकारिता नितीमत्ता तत्वाचे घटकाचे विश्लेषण करणे.
- पत्रकारितेमधील नितीमत्ता सविस्तर स्पष्ट करणे.
- पत्रकारांची जबाबदारी आणि कर्तव्य सविस्तर वर्णन करणे.

## २.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

जागतिक स्तरावरती पत्रकारितेचा विकास अधिक गतिशील विकसित स्वरूपात होताना पाहण्यास मिळते. या पत्रकारितेच्या विकासासंबंधी विचार करत असतात. पत्रकारितेच्या नितितत्व या विषयाची चर्चा जनसमुदायामध्ये पाहण्यास मिळते. ह्या चर्चेमध्ये पत्रकारितेची नितितत्वे पासून दूरलक्षीत होताना दिसतात. यामध्ये व्यक्तिगत पत्रकारिता व्यावसाईक स्वरूपाविषयीची चर्चा करण्यात येते. ही पत्रकारिता वृत्तपत्रे रेडीओ, टी.व्ही चॅनेल आणि इंटरनेटच्या माध्यमातून करण्यात येणारी पत्रकारितेच्या नितितत्वाची चर्चा करण्यात येते.

munotes.in

सर्वसाधारणपणे पत्रकारिता नितितत्व आधारे करण्यात येते का? तिचे स्वरूप आणि व्यवहार काय? याविषयीचे जनमत काय आहे? इत्यादी प्रश्नाचे व्यावहारिक स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. पत्रकारिता नितितत्व मध्ये सत्यता, स्पष्टता, वस्तूनिष्ठता, निष्पक्षता, प्रामाणिकपणा, सार्वजनिक योग्यता इत्यादी नितितत्व व्यवहाराची तपासणी बातमीच्या माहितीच्या सत्यतेसंबंधीत प्रश्न आणि त्याचा जनसमुदायातील त्यानंतरचा प्रसार यांचा संबंध पत्रकारितेच्या नितितत्वाशी जोडण्यात आला आहे.

पत्रकारिता नितितत्वाशी व्यवस्था विस्तृत स्वरूपात पाहण्यास मिळते. हे तत्व मध्ये 'Limitation of harm' यांचा समावेश करण्यात आला आहे. हे बातमीच्या सविस्तर लेखनातून समजून घेता येते. ज्या माहितीमुळे समाजात हानीकारक परिस्थिती उद्भवणार नाही यामध्ये गुन्हेगारी बातम्या मधील माहितीच्या संदर्भात नितितत्वाचा वापर करणे महत्त्वाचे समजले जाते. या नितितत्वाच्या संबधीत युरोपियन देशातील पत्रकारिता नितीतत्व याचा व्यवहारात वापर केला जातो. यामध्ये वंश, धर्म, लैंगिकता, शारीरिक आणि मानसिक अपंगत्व इत्यादीविषयी भेदभाव करणारी बातमीला आधार देता कामा नये. यासंबंधी पत्रकारिता नितीतत्वाचे पालन करणे आवश्यक आहे. The Parliamentary Assembly of the Council of Europe यांनी सन १९९३ साली १००३ कलमाचे पत्रकारिता नितितत्व मान्यता दिली आहे की, ज्यामध्ये पत्रकारितेचा सन्मान, आणि निरागसपणाची कल्पना ही उपन्याय यांच्या अंतर्गत यांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे पत्रकारितेच्या नितितत्वात अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

## २.२ पत्रकारिता नितीतत्व व्याख्या (DEFINATION OF ETHICS OF JOURNALISM)

पत्रकारिता नितीतत्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) **इनस्याक्लोपिडिया (Encyclopedia)** यांच्या मते 'पत्रकारिता नितीतत्व" समाजातील पत्रकारितेच्या भूमिका आणि बातमी संघटनाच्या व्यवहाराचे सुक्ष्म स्तरावरती वर्णन आणि टिकात्मक विश्लेषणाची पद्धती म्हणजे पत्रकारिता नितीतत्व असे म्हणतात.

२) अमेरिकन सोसायटी ऑफ न्युज इडिटर (२०१५) यांच्या मते पत्रकारितेच्यासाठी नैतिकता आणि योग्य चांगला व्यवहार तत्वाचे समावेश करणे म्हणजे पत्रकारिता नितितत्व असे म्हणतात.

थोडक्यात पत्रकारिता नितितत्वाचा अर्थ असा की ही बातमीदार मार्गदर्शक असणारी सामान्य मुल्य म्हणून ओळखले जाते. ही तत्व पत्रकार संपादक आणि वृत्तपत्रासंबंधी काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचारी कार्यवाहक आणि संस्था यांच्या कार्याची जबाबदारीची अपेक्षा आणि जाणीव करुन देणारी तत्वे म्हणून पत्रकारिता नितीतत्व म्हणून समजले जाते. लोकशाही प्रधान देशामध्ये पत्रकारिता नितितत्वाची भूमिका ही सर्वसामान्य जनतेच्या मध्ये बातमी आणि माहितीच्या स्वरूपात प्रसार करणे तसेच शासन

munotes.in

व्यवस्थेच्या धोरणाचा परिणाम जनतेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी कसा होतो यावरती कटाक्ष सुक्ष्म लक्ष देण्याबाबत भूमिका निभावतात.



**आपली प्रगती तपासा :**

१) पत्रकारिता नितितत्वाची व्याख्या सांगा.

## २.३ पत्रकारिता नितितत्व मुल्य (VALUES OF ETHICS OF JOURNALISM)

पत्रकारिता नितितत्व ही पत्रकारितातील व्यवहारातील बातमी, माहिती विश्वसनियता खात्री देण्यासाठी निर्माण करण्यात आली. यासंबंधीचे व्यवहाराच्या स्वरूपाचा स्विकार आणि प्राप्त परिस्थितीमध्ये निर्माण झालेले अडथळे दूर करण्याच्या उद्देशाने पत्रकारिता नितितत्वाची निर्मिती करण्यात आली. या परिस्थितीत संघर्ष टाळून यामध्ये अधिक विश्वसनीय माहिती बातमीच्या स्वरूपात स्पष्ट केली जाते. त्याचबरोबर बातमीच्या संदर्भातील माहितीचे पूर्वाग्रह दरितता आणि आक्षेपार्ह लिखाण प्रकाशित न करता वृत्तपत्राच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे मुल्य जपण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे आवश्यक आहे. पत्रकारिता नितितत्व मुल्ये पुढील मुद्याच्या आधारे स्पष्ट करता येतील.

### १) प्रामाणिकपणा (Honesty) :

पत्रकारितेचे प्रथम महत्त्वपूर्ण मुल्य म्हणून प्रामाणिकपणा ओळखले जाते. ही सत्यतेसाठी संबंधीत आहे. बातमीच्या लेखनासाठी प्रामाणिकता ही वास्तवाच्या घटनेच्या स्वरूपाशी संबंधीत आहे. सामाजिक वास्तवाचे स्वरूप बातमीच्या स्वरुपात नोंदवणे आवश्यक आहे. असे केले नाहीतर बातमीच्या सतत्येच्या प्रामाणिकतेचे प्रश्न उपस्थित केले जातील यासाठी पत्रकारितेची नितितत्व प्रामाणिक असणे आवश्यक आहे.

### २) स्वातंत्र्य आणि वस्तूनिष्ठता (Independence and Objectivity) :

पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्य करत असताना बातमीदारमी मध्ये स्वातंत्र्य आणि वस्तुनिष्ठता मुल्याची जपणूक करणे आवश्यक आहे. पत्रकारांनी बातमी लेखन करत असताना आपल्या स्वत:चे हेतू किंवा आर्थिक व्यवहाराला बळी न पडता आपले बातमीदारीचे स्वातंत्र्य अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न केले जातात. तसेच बातमी लेखन मध्ये वस्तुनिष्ठा मुल्याची जपणूक करण्यातून सामाजिक घटनाची सत्यता पडताळून पाहणे आवश्यक आहे. बातमी लेखनात वास्तविक घटनाविषयीचे पूर्वाग्रह दूषित न ठेवता करणे आवश्यक आहे. यासाठी पत्रकारांनी व्यक्तिगत लाभ विशेषत: आर्थिक लाभासाठी फायदे या पासून मुक्त राहणे आवश्यक आहे. तेव्हा पत्रकारिता नितितत्व मुल्याचे व्यवहारात उपयोजन करता येईल.

munotes.in

**३) भयमुक्त (Fairness) :**

पत्रकार हा वास्तव घटनांची नोंद करताना भयमुक्त राहून बातमी लेखन करणे आवश्यक आहे. पत्रकारांनी घटनेचे लेखन करताना बाह्य आणि अंतर्गत घटकांचा परिणामात्मक दबावाला बळी न पडता भयमुक्तपणे त्यांच्या बातमीदारी संपादकीय आणि वितरण व्यवस्थेत करताना या मुल्याची जपणूक करणे आवश्यक आहे.

**४) व्यासंग (Diligence) :**

पत्रकारितेच्या व्यवसायामध्ये अधिक प्रमाणात व्यासंगाला महत्त्व प्राप्त झाले आहे. पत्रकारांना सामाजिक वास्तविक घटनेच्या आधारे बातमीच्या लेखनाचे व्यासंग असणे आवश्यक आहे. त्यामुळे वास्तवाचे प्रतिनिधित्व करणारे लेखन केले जाते. त्यामुळे योग्य घटनेचे सादरीकरण करण्यात येते. यातून पत्रकारितेचे व्यासंग जपण्यात यते.

**५) उत्तरदायित्व (Accountability):**

पत्रकारितेमध्ये उत्तरदायित्वाच्या मुल्याला महत्त्व आहे ही कार्याच्या संबंधीत उत्तरदायित्वाशी संबंधीत आहे. पत्रकारितेमध्ये जाणीवपूर्वक आणि चिकित्सामकतेचा स्वीकार केला जातो. त्यामुळे पत्रकारितेला जबाबदार शिस्तबद्ध आणि सुव्यवस्थितपणे कार्य करता येतात.

थोडक्यात पत्रकारिता व्यवसाय म्हणून स्वीकारत असताना त्याच्या मुल्यांचे व्यवहारात अंमलबजावणी करणे महत्त्वाचे असते. तेव्हाच पत्रकारितेला नैतिकतेचा दर्जा प्राप्त होईल.

## २.४ पत्रकारिता नितितत्वाचे घटक (ELEMENTS OF JOURNALIS ETHICS)

सामान्यत: पत्रकारिता नितितत्वाचे प्राथमिक स्तरावरील सर्वसामान्य घटक पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) वास्तविक बातमीसाठी अचुकता आणि मानके (Accuracy and Standards for Factual Reporting) :**

बातमीदारी मध्ये विश्वसनीय माहितीच्या उपलब्धतेचा अवकाश आणि पूर्वतयारी वेळेवर करण्याबरोबर अचूकतेची शक्यता अधिक असते. यासाठी अपेक्षित अचूकता बातमीच्या संदर्भात स्पष्टता असणे आवश्यक मानले जाते. बातमीदारी मध्ये प्रत्यक्षात घडणार्या घटनांचे साक्षीदार असणे आवश्यक आहे. त्यामुळे वास्तविक घटनेचे अचूक लेखन बातमीच्या स्वरूपात नोंद केली जाते. बातमीदारीमध्ये स्वतंत्र वास्तवातील तथ्याची तपासणी करुन नंतरच त्याचे प्रकाशन केले जाते. बातमीच्या प्रकाशन वेळी त्याचे योग्य संपादन करणे त्यामुळे बातमीत आढळून येणार्या चूकांचे निरसन व दुरुस्त्या करता येतात. त्यामुळे बातमीचा जनमानसात नकारात्मक परिणाम दिसून येण्यास कमी होतो. याचबरोबर अहवाल, सर्वेक्षण आणि सांख्यिकीय माहिती यातील अचूकता ही

संकल्पनात्मक निष्कर्ष स्पष्ट करता येणे आवश्यक आहे. यासाठी वास्तविक बातमीच्या लेखनामध्ये अचुकता आणि मानकाच वापर करता येतो.

**२) निंदा आणि अपराधी विचार (Slander and Libel Consideration) :**

बातमी मधील सत्यता ही अपराधी होऊ शकत नाही. त्यासाठी अचूकता निर्माण करणे आवश्यक आहे. व्यक्तिगत खाजगी माहिती ही सार्वजनिक हितसंबंधापेक्षा वेगळ्या स्वरूपात असते. त्यामुळे त्यांचा समतोल करणे महत्त्वाचे असते. खाजगी माहितीचा स्वतंत्र अधिकाराचा भाग मानला जातो. जर बातमी ही नागरी प्रकरणासाठी प्रतिकारक असेल तर बातमी द्वेष मुक्त स्वरूपाची होईल हे वास्तविक घटणाच्या आधारे अधिक समजून घेता येते. प्रकाशकाने कायदेशीर आधारे बातमीचे जोमाने समर्थन केले तर अपराक्षी स्वरूपाची शाश्वती निर्माण होऊ शकत नाही.

**३) तत्व हानी मर्यादा (Harm Limitation Principle) :**

बातमीच्या सादरीकरणामध्ये सर्वसामान्यपणे बातमीची माहिती संकलनासाठी मुलाखत नियोजन पार्श्वभूमी तपासणे. फोटो घेणे, व्हिडियो रेकॉर्डिंग करणे याचा वापर न्यायकिक तपासणीसाठी केला जातो. त्यामुळे बातमीच्या स्पष्टतेमध्ये तत्व हानीला मर्यादा निर्माण होते. ज्यामुळे सर्वसामान्यता बातमी वाचनातून वास्तविक परिस्थिती समजून घेता येते. या तत्वामुळे नकारात्मक परिणामाची संपूर्ण चर्चा व्यवहारामध्ये नैतिकतेची कोडी संबंधीचा व्यवहाराची निर्मिती होऊ शकते.

थोडक्यात बातमीदाराची नितितत्व अभ्यासत असताना वरील सर्व घटकाचा विचार करणे आवश्यक आहे. बातमीदारीतील नैतिकतेचे सर्व सामान्य घटक हे सामाजिक वास्तवातील तथ्याचे बातमीच्या सादरीकरणामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असल्याचे पाहण्यास मिळते.

## २.५ पत्रकारितेतील तत्व (ETHICS IN JOURNALISM)

पत्रकारितेमध्ये तत्वाना अधिक महत्त्व आहे कारण ती पत्रकारितेला मार्गदर्शक म्हणून मदत करत असतात. सामाजिक वास्तविक घटनाचे सादरीकरण हे बातमीच्या स्वरूपात केली जाते. त्याला भौतिक स्वरुपातील सत्यतेचा आधाराचे साधनाच्या माध्यमातून स्पष्ट केले जाते. यासाठी पत्रकारितेचे नितीतत्व हे न्यायाच्या समतेच्या आणि वास्तवाच्या मुल्याच्या आधारे अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. याची नितितत्व पुढील मुद्याच्या आधारे स्पष्ट करता येतील.

**१) सत्य आणि अचुकता (Truth and Accuracy) :**

पत्रकारितेमध्ये सत्य आणि अचुकता या नितितत्वात अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण बातमीची भौतिक तथ्याच्या आधारे लेखन केले जाते. तेच बातमीचे सत्य असते ते निर्माण केले जात नाही. त्यामुळे बातमीच्या सत्यतेला महत्त्वाचे मानले जाते. याचबरोबर बातमीची अचूकता तपासून पाहणे आवश्यक आहे. दैनंदिन जीवनात अनेक

वास्तविक प्रसंगाची निर्मिती होत असते. या प्रसंग, घटना आणि माहितीची अचूकता तपासणे आवश्यक आहे तरच ती बातमी जनतेच्या विश्वासास पात्र होईल. यासाठी विश्वसनीय स्त्रोताकडून त्याची योग्य तपासणी करुन त्याची बातमी मध्ये समावेश करावा लागेल. तेव्हा बातमीदारीमध्ये सत्यता आणि अचूकता या नितीतत्वाचा अवलंब होऊ शकेल.

**२) स्वातंत्र्य (Independence) :**

पत्रकारिता ही अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरती आधारित आहे. दैनंदिन जीवनात घडणार्या घटनांची नोंद बातमीच्या स्वरूपात स्पष्ट केले जाते. तेव्हा त्याची वास्तविकता सत्यता आणि अचुकतेची नोंद ठेवण्यात येते. यासाठी वास्तवधरणाचे स्वरूप स्पष्ट करण्याचे स्वातंत्र्य पत्रकारितेमध्ये महत्त्वाचे नितितत्व म्हणून समजले जाते. हे स्वातंत्र्य नितितत्व व्यवहारात उपयोगात आणताना संस्कृती, परंपरा, रूढी, प्रथा, श्रद्धा इत्यादींना बळी न पडता स्वातंत्र्य टिकवून ठेवले जाते. त्याचबरोबर स्थानिक राजकारण शासन सत्ता आणि भांडवली व्यवस्थेबरोबर आपले हितसंबंध न ठेवता आपली सामान्य जनतेच्या प्रश्नासी असणारी बांधिलकी आणि जाणीव ही स्वातंत्र्याच्या नितितत्वामध्ये जपण्याचे कार्य पत्रकारितेच्या माध्यमातुन करता येते.

**३) निष्पक्षता आणि निपक्षपातीपणा (Fairness and Impartiality) :**

पत्रकारितेमध्ये दैनंदिन जीवनात घडणार्या घटनांचे बातमी लेखन करत असताना निष्पक्षता आणि निपक्षपातीपणा नितितत्वाचे पालन करणे आवश्यक मानले जाते. यासाठी वास्तविक घटनाच्या दोन्ही बाजू तपासून पाहणे महत्त्वाचे ठरते. तेव्हा वास्तवाचे स्वरूप बातमीमध्ये स्पष्ट नोंदवता येते. यासाठी बातमीदार हा संबंधीत घटनेबाबत पूर्वाग्रह दूषीत असता कामा नये. तरच त्या घटनेचा निपक्षपातीपणे तटस्थ राहून बातमी लेखन करता येऊ शकते. याचबरोबर बातमीच्या विश्वसनीयतेची आणि आत्मविश्वासाच्या आधारे निपक्षपातीपणाचे बातमीचे नितितत्व जपता येते.

**४) मानवता (Humanity) :**

पत्रकारिता मुलतत्व हे मानवतेच्या आधारावरती निर्माण करण्यात आले आहे. ज्यामुळे समाजाला कोणत्याही प्रकारच्या समस्येला सामोरे जावे लागणार नाही. बातमीच्या लेखन संपादन आणि सादरीकरणाच्या माध्यमातून वास्तव घटनाचे मानवतावादी नितितत्वाच्या आधारे बांधणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधीत घटनांचे बातमी लेखन करत असताना संवेदनशील, सृजनशील आणि परिणामकारक लेखनातून योग्य शब्द, भाषा आणि फोटो यांचा वापर करणे आवश्यक होईल. यातून समाजामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, सन्मान आणि न्यायाच्या मुल्याच्या आधारे मानवतेचे नितितत्व पत्रकारितेमध्ये व्यावहारिक स्तरावरती उपयोग करण्यात यावा.

### ५) उत्तरदायित्व (Accountability):

पत्रकारिता ही समाजाच्या उत्तरदायित्वाची जबाबदारपूर्ण भूमिका निभावत असते. यासाठी पत्रकारितेमध्ये व्यावसायिक आणि जबाबदारपूर्ण वर्तन व्यवहार पात्रता ही उत्तरदायित्व निततत्व निर्माण करण्यास कारणीभूत ठरत असते. पत्रकारितेमध्ये सामाजिक घटनाशी बांधिलकी जाणीवपूर्ण निभावणे महत्त्वाचे आहे. यासाठी आपल्या वृत्तपत्राच्या वाचकांची अभिरुची आवडी आणि मते यांच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. तेव्हा आपल्या वाचकाला योग्य, अचूक, वस्तूनिष्ठ माहिती पोहचवते ही बातमीदाराचे उत्ततदायित्वाचे नितितत्व जपण्याचे आणि अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

थोडक्यात बातमीदाराचे नितितत्व ही योग्य वर्तन व व्यवहाराचे मापदंड म्हणून उपयोगी पडते. या तत्वाचा समाजाच्या विकासासाठी करता येऊ शकतो. या तत्वाचा समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, सन्मान आणि न्यायाच्या तत्वानुसार भूमिका निभावणे आवश्यक आहे. तरच पत्रकारितेचे नितितत्वाना व्यवहाराचा आधार प्राप्त होईल.

**आपली प्रगती तपासा :**

१) पत्रकारितेचे नितितत्व सविस्तर लिहा.

## २.६ पत्रकारांची जबाबदारी आणि कर्तव्य (DUTIES AND RESPONSIBILITY OF JOURNALISTS)

पत्रकाराची जबाबदारी आणि कर्तव्ये ही लोकशाही शासन व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका म्हणून समजले जाते. या व्यवस्थेत पत्रकार आपले स्वातंत्र्य प्रतिनिधी म्हणून कार्य करत असतो. सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नाची मांडणी करण्याची भूमिका निभावत असते. त्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी विविध स्तरावरती प्रयत्न करत असतो. त्याच सोबत माहिती लेखन संपादन आणि सादरीकरण करत असताना कर्तव्यपर, निष्ठा, निपक्षपाती, तटस्थता, वस्तुनिष्ठ वैज्ञानिक मुल्याच्या आधारे भूमिका निभवावी लागतात. हे सर्व दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब बातमी लेखन संपादकीय प्रासंगिक लेखन मनोरंजन जाहिरात इत्यादी स्वरूपात विविध विषयाची मांडणी करत असतात. तेव्हा आपली कर्तव्ये आणि जबाबदारीचे पालन करणे आवश्यक आहे. पत्रकारांची कर्तव्ये आणि जबाबदारीचे काही मुद्दे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १) सत्यपणाद्वारे सत्याचे समर्थन (Uploading the Truth through verification) :

बातमीदार बातमी लेखन करत असताना सत्याच्या आधारे माहितीच्या आधारे लेखनाचे कर्तव्य करावे लागते. हे लेखन करत असताना वास्तविक तथ्याना अधिक महत्व देणे आवश्यक असते. दैनंदिन जीवनात घडणार्या घटनांचे वस्तूनिष्ठ व निपक्षपाती व पूर्वाग्रह दूषितपणे निरीक्षण करणे आवश्यक आहे. त्यामधील गुंतागुंतीचे स्वरूप पाहत असताना

सत्याचे समर्थन करुन बातमीचे सादरीकरण संपादन आणि लेखन करण्याचे कर्तव्य निभवावे लागते.

**२) बातमीलेखन पूर्वाग्रहदूषीत (Unbiased Reporting) :**

पत्रकारांनी बातमीलेखन करताना पूर्वाग्रहदूषीत चा प्रभाव पडता कामा नये. बातमी लेखन हे वास्तविक परिस्थितीचे निरीक्षणावरती आधारित असते. त्यांच्या योग्य नोंदी व तपशील याची नोंद ठेवणे आवश्यक असते. हे करत असताना धर्म, जात, लिंग, वर्ग, सामाजिक, राजकीय दबाव, भावनिकता इत्यादी गोष्टीचा प्रभाव बातमीलेखनाच्या पूर्वग्रहदूष्टीतेवरती परिणाम होऊ देऊ नये. तसेच कोणत्याही पद प्रतिष्ठा आर्थिक लाभाच्या अपेक्षेला समर्थन न करता निपक्षपाती आणि निस्वार्थी कर्तव्यनिष्ठ जबाबदारीचे पालन करणे हेच आपले कर्तव्य समजून बातमी लेखनाचे कर्तव्याचे पालन करावे.

**३) लोकांची सेवा लक्षपूर्वक करणे (Serving the Public as a Watchdog) :**

पत्रकारिता ही जनसेवा म्हणून केली जाते. ती भांडवली शासन व्यवस्थेचे कार्य करत नाही. पत्रकारिता ही जनसेवेचे माध्यम म्हणून कार्य करत असताना त्यामुळे लोकशाही व्यवस्थेचा चौथा खांब म्हणून ओळखले जाते. या माध्यमातून जनतेच्या हितासाठी सतत्यनेककर्तव्य तत्पर म्हणून भूमिका निभवावी लागते. जनतेचे सर्व प्रश्न सरकार शासन आणि राज्यकर्ते याच्या समोर सातत्याने मांडून त्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्य करावे लागते. सर्वसामान्य जनतेसाठी शासन व्यवस्था विविध योजनाचा निमित्त अंमलबजावणी आणि परिणामकारकता याचा लक्षपूर्वक बातमीलेखन करण्यासाठी भूमिका निभावत असतात. स्थानिक नागरिकांना अपेक्षा गरजा पूर्ण करण्यासाठी शासन व्यवस्थेला योजना बद्ध व्यावहारिक अंमलबजावणी करण्यास भाग पाडणे यासाठी बातमी लेखन केले जाते. पत्रकार हे स्थानिक नागरिक आणि शासनाच्या कार्यावरती लक्षपूर्वक कार्य करत असतात.

**४) सार्वजनिक टिपणीसाठी मंच (Forum For Public Comments) :**

पत्रकारिता ही सार्वजनिक टिपणी करण्यासाठी मंच उपलब्ध करुन देते. या माध्यमातून स्थानिक प्रशासन राजकारण आणि न्यायव्यवस्थेच्या धोरणाचा जनसामान्याच्या जीवनावरती सकारात्मक आणि नकरात्मक परिणामाची मुक्त चर्चा या माध्यमातून केली जाते. पत्रकारानी जनमताच्या आधारे बातमीलेखन संपादन आणि प्रासंगिक लेखन केले जाते. या जनमताच्या आधारे सार्वजनिक योजना व लाभार्थी याची चिकित्सक मांडणी ही वास्तव आणि अनुभवाच्या प्रकटीकरण केले जाते. त्याचा परिणाम नागरिकांना त्याच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यात पत्रकारांनी कर्तव्य व जबाबदारी निभवावी लागते.

**५) बातमीचे वेळेवर लेखन (Complete Reporting):**

पत्रकारांना दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटकावरती लक्ष केंद्रित करावे लागते. या घटनाच्या आधारे बातमीचे लेखन तत्परतेने वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्या

घटनेचे महत्त्व किती आहे याच्या आधारे बातमीचे लेखन केले जाते. त्यांचे संशोधकीय महत्त्व ओळखून नागरीकांना माहिती देण्यात येते. या बातमीचा विशिष्ट उद्दिष्ट निश्चित करुन लेखन केले जाते. त्यामुळे मुख्य समस्येकडे लक्ष केंद्रित करतात. त्याचे जाणीवपूर्वक करमणूकीमध्ये रूपांतरण केले जात नाही. यासाठी वृत्तपत्र संस्था ह्या विविध बातम्याच्या संकलनासाठी अनेक विभागात पत्रकाराची नेमणूक केली जाते. त्यामुळे बातमीचे स्वरूपानुसार त्यांची स्वतंत्र लेखन तत्परतेने करतात.

### ६) बातमीमध्ये अधिक आवड निर्माण करणे (Making Interest in News) :

बातमीच्या लेखनामध्ये सुव्यवस्थिपणा असणे आवश्यक आहे. त्यामुळे जनतेमध्ये बातमीची अधिक आवड निर्माण करण्याचा प्रयत्न संपादकीय विभाग करत असतो. बातमीलेखनात महत्त्वाची समस्या स्पष्टपणे मांडण्याचे काम करतात. त्या प्रश्नाविषयी वाचकामध्ये उत्सुकता, कुतुहल आणि जाणीव निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला जातो. बातमीचा प्रभाव वाचकावरती अधिक परिणामकारक मत विचार आणि अभिव्यक्तीच्या सादरीकरणावरती आल्याशिवाय राहत नाही. बातमीच्या लेखनातून विश्वव्यापक संदर्भ घेऊन त्याच्या वाचक वर्गासमोर ठेवला जातो. त्यामुळे व्यापक समुदयात संदेश पोहचवण्याचे काम केले जाते. परिणामी बातमीमध्ये अधिक आवड निर्माणामुळे वाचकवर्गामध्ये अधिक आकर्षण निर्माण केले जाते.

### ७) बातमी मधील व्यक्तिगत तत्व (Personal Principle in Reporting) :

बातमीदारी मध्ये व्यक्तिगत तत्व हे जबाबदारपणे नोंदवणे गरजेचे आहे. वृत्तपत्राची संस्था ही बातमीच्या स्वरूपावरुन विविध मताची निर्मिती केली जाते. बातमी लेखन करत असताना व्यक्तिगत आवाज संपादकीय कार्यालयामध्ये नोंदवण्याचे काम करत असतात. त्यामध्ये आपली व्यक्तिगत तत्वाची जपवणूक करत असतात. बातमीच्या लेखनामधून कोणताही पक्षपात व्यक्तिगत हितसंबंध पूर्वाग्रह दूषितता, भ्रष्टाचार इत्यादी गैर मार्गाचा अवलंब न करता आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आपले हक्क आणि जबाबदारीचे योग्य अंमलबजावणी करावी तरच पत्रकारिता स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केले जातात.

थोडक्यात पत्रकाराची कर्तव्य आणि जबाबदारी ही बातमीचे लेखनात महत्त्वपूर्ण भूमिका निभावते. आपल्या वाचक वर्गापर्यंत वास्तविक माहिती पोहचवण्यासाठी अधिक तत्परता निष्ठा अचुकता स्पष्टता वस्तूनिष्ठता इत्यादी तत्वाचा वापर करुन आपली बातमी लेखन संपादन आणि सादरीकरणाच्या पातळीवरुन बातमीदारांनी आपली कर्तव्ये आणि जबाबदारीचे योग्य पालन करणे आवश्यक आहे. त्यामुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात बहुमोल असे योगदान निर्माण करता येईल.

**आपली प्रगती तपासा :**

१) पत्रकारांची जबाबदारी आणि कर्तव्ये सविस्तर चर्चा करा.

## २.७ सारांश (SUMMARY)

जागतिक स्तरावरती पत्रकारितेची ओळख ही तिच्या नितीतत्वाच्या आधारे केली जाते. पत्रकारिता हा जरी व्यवसाय असला तरी त्याला मानवी नितीमुल्याची जोड देण्यात आली आहे. त्यामुळे हा व्यवसाय टिकून ठेवला आहे. या व्यवसायात मानवी संबंधाची व्यवस्था जोडण्याचे व्यापक जाळे आहे. जे परस्परांमध्ये संबंधाची रचना करताना दिसते. असे जरी असले तरी पत्रकारितेच्या क्षेत्रात नितितत्वाची काही प्रमाणात घसरण होत चालली आहे. हे आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये आपले माध्यम अधिक गतिशील व प्रगत कसे राहील याचा विचार करुन कार्य करत आहे. पण हे करताना पत्रकारितेचा नितीतत्वाचा विसर पडून चालणार नाही. तरच पत्रकारितेचे अस्तित्व जनमानसात टिकूण राहिले. यासाठी अपेक्षित असणार्या भूमिका आणि कर्तव्ये यांना नीतत्वाची जोड देणे आवश्यक आहे. तरच पत्रकारिता अस्तित्व अधिक स्पष्ट न्यायिक आणि मानवतावादी मुल्याच्या आधारे स्पष्ट होईल.

## २.८ प्रश्न (QUESTIONS)

१) पत्रकारितेतील नितीमत्ता ही संकल्पना सांगून त्यांचे स्वरूप स्पष्ट करा.

२) पत्रकारितेतील नितीमुल्य विषय सविस्तर लिहा.

३) पत्रकारितेतील नीतीतत्वाचे घटकांचे विश्लेषण करा.

४) पत्रकारितेची नितीतत्वाचे सविस्तर वर्णन करा.

५) पत्रकारितेतील पत्रकाराची जबाबदारी आणि कर्तव्ये सविस्तर स्पष्ट करा.

## २.९ संदर्भ ग्रंथ (REFERENCE)

1) Sanders Karen 2005 Ethics and Journalism Sage Publication London.

2) Kelly Mcbride & Tom Rosentiel 2014 The New Ethic of Journalism Sage Publication London.

3) Harcup Tony 2007 – The Ethical Journalist, Sage Publication, London.

4) Keeble Richard 1948 Ethics for Journalism. Routlege Book Publication, U.K.

5) Frost Chris 2016, Journalism Ethics and Regulation Routledge book Publication, U.K.

❖❖❖❖

munotes.in

# २अ

## पत्रकारितामधील स्त्रीया
## WOMEN IN JOURNALISM

**प्रकरणाची रचना :**

२ अ.० उद्दिष्टे

२ अ.१ प्रस्तावना

२ अ.२ पत्रकारितेतील स्त्रीची व्याख्या

२ अ.३ पत्रकारितेतील स्त्रीयांचे स्वरूप

२ अ.४ पत्रकारितेतील स्त्रीयांचा पूर्व इतिहास

२ अ.५ पत्रकारितेतील स्त्रीयांच्या समस्या

२ अ.६ पत्रकारितेतील स्त्रीयांच्या समस्येवरील उपाययोजना

२ अ.७ सारांश

२ अ.८ प्रश्न

२ अ.९ संदर्भ पुस्तकांची यादी

## २अ.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

- पत्रकारितेतील स्त्रीयांविषयीची संकल्पनात्मक स्वरूप समजून घेणे.
- पत्रकारितेतील स्त्रीयांचा पूर्व इतिहास सविस्तर स्पष्ट करणे.
- पत्रकारितेतील स्त्रीयांच्या समस्या व उपाययोजना यांचे सविस्तर विश्लेषण करणे.

## २अ.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये व्यापक प्रमाणात परिवर्तन होत आहे. या परिवर्तनाचा परिणाम समाज जनमतावरती परिणामकारक व निर्णायक मतावरती होते. हे पाहत असताना बातमी लेखनाच्या प्रक्रियेमध्ये स्त्री-पुरुषांची बातमीदाराचा भूमिकेतून जबाबदारपूर्वक सादरीकरण करण्यामध्ये सहभाग नोंदवला आहे. विशेषत: पत्रकारितेच्या व्यवसायामध्ये स्त्री पत्रकारांचा सहभाग महत्त्वाचा म्हणून पाहिले जाते. या व्यवसायाचा शोध पत्रकारिता, गुन्हेगारी, पत्रकारिता, मानव अधिकार, भ्रष्टाचार आणि समाजातील इतर समस्येवरती कार्य करत असतात. त्याचबरोबर सहकरी पुरुष पत्रकाराकडून हेतूपुरस्कर विरोध, कमीपणाची वागणूक, भौतिक शारीरिक अत्याचार, समस्या सारख्या समस्यांना सामोरे

munotes.in

जावे लागते. स्त्री पत्रकारांना लिंगभेदभाव आधारित शोषणाला अधिक प्रमाणात अत्याचारांना बळी पडावे लागते. यामध्ये मानसिक, शारीरिक आणि लैंगिक अत्याचाराचे प्रमाण अधिक आढळून येतात.

स्त्री पत्रकारिता संबंधी Women Media Foundation (IWMF) यांनी विविध प्रश्नासंबंधी अभ्यास केला आहे. त्यांच्या मते स्त्री पत्रकार ह्या अडचणीच्या प्रश्नासंबंधी स्पष्ट बोलू शकत नाही. जे कामाच्या संदर्भात स्पष्टता दर्शवत असतात. यामधील समस्या स्पष्ट करणारा अभ्यास यातून दाखवून देण्यात आला. या संस्थेने ९५५ स्त्री पत्रकारांना सर्वे करण्यात आला. ज्यांनी कामाच्या ठिकाणी स्त्री पत्रकाराचा दुरुपयोग करण्यात आला हे स्पष्ट दिसून आले. ज्यामध्ये व्यक्तिगत जबाबदारीच्या आधारे अत्याचार करणे, लैंगिक आणि शारीरिक अत्याचाराचे प्रमाण अधिक प्रमाणात या सर्वेक्षणातून पाहण्यास मिळाले. या सर्वेक्षण स्त्री पत्रकारांना लिंगभाव आधारित दुय्यमत, प्रभूत्व, वर्चस्व, अपमानास्पद वागणूक आणि अत्याचाराच्या प्रमाणात वाढ होताना पाहण्यास मिळते.

जागतिक स्तरावरती स्त्री पत्रकारिता संदर्भात ARTICLE १९ यांनी स्त्री पत्रकारांच्या अत्याचार्याच्या घटनांचे साक्षीपुरावे आणि पुरावे याचे संकलन केले. या सर्वेक्षणात मेस्कीको, बांग्लादेश, ब्राझील, हॉन्डरेस आणि रशिया इत्यादी देशाचा समावेश यामध्ये करण्यात आला. या देशामध्ये पत्रकारांना कोणत्या प्रकारची वागणूक दिली जाते याचा अभ्यास केला. स्त्री-पुरुष पत्रकारीतेमधील दर्जा आणि भूमिकाविषयीचे प्रश्न नोंदवण्यात आले. यामध्ये स्त्री पत्रकारांचा द्वेष करण्याचे प्रमाण पुरुष पत्रकारात अधिक दिसून आले. स्त्री पत्रकारांवरती शारीरिक हल्ले, खून करणे, अपमानकारक भाषा आणि लैंगिक अत्याचार प्रमाण अधिक पाहण्यास मिळाले. हे स्त्री पत्रकारांचा अनुभव कथनामधून नोंदवण्यात आले.

## २अ.२ पत्रकारितेतील स्त्रीची व्याख्या (DEFINITION OF WOMEN IN JOURNALSM)

विकिपीडीया यांच्या मते, 'पत्रकारितेतील स्त्रीया ही व्यक्तिगत बाब आहे. ज्या पत्रकारिता व्यवसायामध्ये स्वत:हून सहभागी होतात. ते व्यवसाय म्हणून कार्य करतात. त्यांच्यावरती प्रथांचे निर्बंध असतात आणि व्यवसायामध्ये शोषणाला सामारे जात असता पत्रकारितेतील स्त्रीया या पत्रकार संपादक आणि वृत्तविश्लेषक म्हणून भूमिका निभावतात. त्यांना पत्रकारितेतील स्त्रीया असे म्हटले जाते."

१) **पॅट्रिका होलान्ड (Patrica Holland)** यांच्या मते 'पत्रकारितेतील स्त्रीया यावरती स्त्रीयांची मर्यादा लादण्यात आली आहे. बातमीदारी मध्ये विशिष्ट स्वरूपाचे मेहनतीचे काम करावे लागते. या संबंधीच्या समस्येविषयी स्त्री हक्का विषयीच्या मागणीची सार्वजनिक स्तरावरती न्यायाच्या भूमिकेतून प्रतिनिधी करतात. त्यांना पत्रकारितेतील स्त्री म्हणून म्हटले जाते."

थोडक्यात पत्रकारितेतील स्त्री ही व्यावसायिक भूमिकेतून विविध स्तरावरती कार्य करते. या क्षेत्रामध्ये आपले स्वतंत्र्य अस्तित्व निर्माण करत असते. ती समस्त स्त्रीयांच्या हक्कांचे प्रतिनिधित्व करण्याचा प्रयत्न करते. स्त्री पत्रकार ह्या स्त्रीयांच्या विविध प्रश्नांचे सादरीकरण करण्यात येते. त्यामुळे स्त्रीयांचे वास्तव अनुभव आणि जाणीवानेणीचेच्या तर्कशास्त्रा आधारित चिकित्सेचे प्रश्न उपस्थित करतात. त्याला पर्यायी व्यवस्थेचे अस्तित्व निर्माण करणाने विकासात्मक संरचनात्मक राजकारण प्रस्थापित करत असतात. त्या आपल्या प्रश्नावरती सातत्याने संघर्षात्मक प्रतिरोधाची भूमिका नोंदवण्याचे काम पत्रकारिता व्यवसायामध्ये करते. त्या शासकीय न्यायालयीन आणि जनआंदोलनातून अन्याय भेदभाव आणि शोषणाच्या प्रतिविरोधी कार्य हक्क आधारित कार्य करत असतात.

## २अ.३ पत्रकारितेतील स्त्रीयांचे स्वरूप (NATURE OF WOMENS IN JOURNALISM)

१) पत्रकारितेतील स्त्री ही व्यावसायिक स्तरावरील स्वतंत्र अस्तित्व निर्माण करतात.

२) पत्रकारितेतील स्त्रीया आपल्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची नोंद यामध्ये करण्यात येते.

३) पत्रकारितेतील स्त्रीया या व्यवसायात विविध स्तरावरती बातमीदारी, संपादन, जाहिरात, वृत्त निवेदन, लेखन आणि सादरीकरण या स्तरावरती कार्य करतात.

४) पत्रकारितेतील स्त्रीया या पुरुष पत्रकारांपेक्षा आपली कामाची स्वतंत्र भूमिका घेतात तेव्हा त्या पुरुषी वर्चस्वाला नकार देतात.

५) पत्रकारितेतील स्त्री आपल्या स्वतंत्र दृष्टिकोनातून वास्तविक घटनांच्या सहसंबंधाचे विश्लेषण करत असतात.

६) पत्रकारितेतील स्त्रीया या स्त्रीयांच्या विविध समस्ये विषयीचे स्वतंत्र विचारमंच उपस्थित करतात. ज्यामध्ये स्त्रीयांच्या समस्या, प्रश्न, अनुभव, इच्छा, आकांक्षा, वास्तविक जीवन इत्यादीविषयी मुक्त चर्चा करतात.

७) पत्रकारितेतील स्त्री ही स्त्री प्रश्नाचे प्रतिनिधीत्व करताना स्त्री-पुरुष समानता न्याय हक्क आणि सन्मान या मुल्यांचा जपणूक व्यवहाराच्या स्तरावरती करत असते.

८) पत्रकारितेतील स्त्रीया या पत्रकारिता करत असताना कामाच्या ठिकाणचे पुरुषी वर्चस्व भेदभाव, शोषण आणि अमानवी वर्तन व्यवहाराच्या विरोधी कार्य करत असते.

थोडक्यात, पत्रकारितेतील स्त्रीया या व्यवसायात आपले अस्तित्वाचे प्रतिनिधित्व करत असते. तेव्हा अंतर्गत आणि बहिर्गत व्यवस्थेतून निर्माण केलेल्या अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. त्यासाठी संघर्षात्मक भूमिका निभावत असते. त्यामुळे पत्रकारितेतील स्त्रीया आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

१) पत्रकारितेतील स्त्रीची व्याख्या सांगा.

२) पत्रकारितेतील स्त्रीचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा.

## २अ.४ पत्रकारितेतील स्त्रीचा पूर्ण इतिहास (PRE HISTORY OF WOMEN IN JOURNALISM)

एकोणिसाव्या शतकामध्ये पत्रकारितेतील स्त्रीया यांची स्वतंत्र ओळख होताना पाहण्यास मिळते. ब्रिटन आणि युनायटेड स्टेट या देशातील शिक्षित स्त्रीया पत्रकारितेच्या व्यवसायामध्ये याबद्दल Edwin Shuman या पत्रकारांनी लिहिले आहे की बातमी संकल्पनांच्या हा नियम आहे ती स्त्रीयांच्या कामाचा भाग बनला आहे. पण स्थानिक वास्तविक घटनाची बातमीदारी पुरुष वर्गाच अधिक प्रमाणात करत होता. त्यामध्ये स्त्रीयांना फारशी संधी दिली जात नसे. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या काळात स्त्रीयांना घराबाहेर जाऊन काम करण्याची संधी आणि मागणी प्रमाण वाढत होते. पत्रकारिता क्षेत्रामध्ये स्त्रीयांना बातमीदाराचे काम उपलब्द करुन देण्यात येऊ लागले. या काळामध्ये पुरुष बातमीदारासोबत राहून बातमी संकलनाच्या कार्यामध्ये नवशिक्षित मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या स्त्रीया या क्षेत्रात सहभाग नोंदवू लागल्या.

पत्रकारितेतील स्त्रीयांचा संबंध हा प्रकाशमान प्रकरणावरती फॅशन, कला, कौटुंबिक समस्या या प्रश्नावरती लेखन करण्यात येतो. तर पुरुष बातमीदार आर्थिक आणि राजकीय उच्च प्रश्नासंदर्भात गंभीर विषयासंबंधीचे लेखन करत होते. या सोबत स्त्री पत्रकार ह्या ही सामाजिक राजकीय विषयी चर्चात्मक लेखन करत. स्त्री पत्रकार ह्या वाचकाच्या भावनिक मुद्याशी संबंधीत लेखन करत याचबरोबर प्रसिद्धीच्या स्तरावरील बातम्यांचे लेखन करत होते. हे पत्रकारितेचे कार्य करत असताना पुरुषांना मिळणार्या मानधनापेक्षा स्त्रीयांना कमी मानधन मिळत होते. त्यामुळे या क्षेत्रात अनाथ, विधवा, घटस्फोटित स्त्रीयांचे काम करण्याचे प्रमाण अधिक होते. त्याचबरोबर ज्याचे पति कमी वेतनावरती काम करतात. अशा कुटुंबातील स्त्रीया या पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्य करत होत्या.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावरती ब्रिटनमध्ये पत्रकारितेच्या माध्यमातून परिवर्तनाची प्रक्रिया सुरु झाली. या काळात १८५३ साली पत्रकारितेच्या वृत्तपत्रावरील कर रद्द करण्यात आला. या काळात लोकशाही विचारसरणीचा प्रभाव अधिक असल्याने The Common Man सामान्य मानव या आधारे स्त्री-पुरुष भेदभाव न करता समानतेची व सन्मानानाची वागणूक मिळावी यासाठी प्रयत्न करण्यात आला. याच बरोबर नवतंत्रज्ञानाचा वापर करुन वृत्तपत्राचा प्रसार प्रचार आणि वितरण पद्धतीत विकास करण्यात आले.

munotes.in

ब्रिटन मध्ये Mid Victorian Britain या वृत्तपत्राच्या माध्यमातून राजकारण, व्यापार, वाणिज्य, स्त्रीत्व या विषयाचे गंभीर लेखन करण्यात आले. या मुख्य उद्देश हा अधिक प्रमाणातील कामगार वर्गातील वाचक वर्गासाठी लेखन केले जाई. सन १९५० साली ब्रिटीश Daily Telegraphy या वृत्तपत्रामधून मध्यम वर्गीय वाचकांसाठी लेखन करण्यात येई. या वृत्तपत्रात आर्थिक घडामोडी व विवाहा विषयीच्या जाहिरातींचे प्रकाशन करण्यात येते. या काळातील वृत्तपत्रे ही सर्व सामान्य वाचक वर्गाला माहितीचा पुरवठा करणारे साधन म्हणून त्यांचा उपयोग करण्यात आले. या काळात राजकीय घडामोडीच्या वार्तांकनाला अधिक महत्त्व प्राप्त होत गेले.

ब्रिटन मध्ये सन १८८४ ते १८९६ या कालावधीमध्ये स्त्रीयांचा पत्रकारिता क्षेत्रामध्ये अधिक सहभाग पाहण्यास मिळतो. या स्त्री पत्रकारणी दैनंदिन जीवनात घडणार्या घडामोडींचे बातमी लेखनामध्ये करण्यात येऊ लागले. सन १८७० च्या काळात शिक्षण कायदा करण्यात आला. त्यामुळे नवशिक्षितांचा वर्ग विशेषत: स्त्रीयांच्या शिक्षणामध्ये सुधारणा होऊ लागली. त्यामुळे बातमीवाचन लेखन संपादन आणि सादरीकरणाच्या स्तरावरती स्त्रीयांचा या क्षेत्रामध्ये सहभाग नोंदवण्यात येऊ लागला. त्याचे उच्चशिक्षणाचा स्तर उंचावत आला. आपल्या प्रश्नाची व्यापक जाणीव व्यवहाराच्या स्तरावरती वाढताना पाहण्यास मिळाली.

स्त्री पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रथम मार्गारेट फुलेर अमेरिका आणि हरेइट मरटीनेयु ब्रिटन या दोन्ही नवशिक्षित स्त्रीयांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांनी त्यांच्या मैत्रिणीचे संघटन करुन अमेरीकेतील गुलामगीरीच्या विरोधात जनचळवळ उभारण्याचे कार्य केले. यांना घरच्यांकडून या कार्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे गुलामगीरीच्या विरोधात संघषात्मक भूमिका घेऊन चळवळ उभारण्यात आली. सन १८४४ साली मार्गारेट फुलेर यांनी New York Tribune वृत्तपत्राचे सर्वप्रथम अमेरिकन स्त्री म्हणून संपादकाचे कार्य केले. तसेच बातमीदारीच्या क्षेत्रात विविध विषयांवरती सातत्याने लेखन करण्याचे कार्य केले. ब्रिटन मधील Martineau Harriet या मध्यमवर्गीय शिक्षित कुटुंबातील स्त्री पत्रकारिता म्हणून ओळखण्यात येते. त्यांनी Daily News या वृत्तपत्रामध्ये स्त्रीयांच्या विविध प्रश्नांची चर्चा केली. त्यांनी ब्रिटन मधील गुलामगीरी लादणार्या कायद्याच्या विरोधात संघर्षात्मक भूमिका स्विकारली. त्यांनी वृत्तपत्र लेखनामध्ये स्त्रीवाद, अर्थकारण, राजकारण या विषयांना अधिक महत्त्व देऊन विश्लेषण केले.

सन १८९० च्या काळात अमेरिकेत स्त्री पत्रकार म्हणून वृत्तपत्राच्या क्षेत्रात कार्य करु लागल्या. The Times (लंडन) या वृत्तपत्र कार्यालयामध्ये स्त्री प्रत्रकाराची प्रथम नियुक्ती पूर्णवेळ करण्यात आली. या स्त्रीया बातमीकक्षा मध्ये कार्य करत, पण त्यांच्या कल्पनांना फारसे महत्त्व देण्यात येत नसे. Edward Bok यांनी Home Journal च्या प्रथम स्त्री संपादक म्हणून कार्य केले. त्यांनी स्त्रीयांच्या विविध प्रश्नासंबंधात वृत्तपत्रामध्ये लेखन केले. त्यांनी वृत्तपत्राच्या क्षेत्रात विविध स्तरावरती बातमीदारीची भूमिका निभावण्यात यासाठी पत्रकारिता क्षेत्रात स्त्रीयांचा सहभाग वाढीसाठी प्रयत्न केले. यांनी या पुस्तकात त्यांनी स्त्री-पुरुष समान शिक्षणाचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यामुळे सुशिक्षित स्त्रीया पत्रकारितेच्या व्यवसाय क्षेत्रात संधी उपलब्ध करुन देता येईल.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या कालावधीत स्त्रीयांनी पत्रकारिता क्षेत्रामध्ये अधिक प्रमाणात सहभाग नोंदवला आहे. स्त्री पत्रकारितेने सामाजिक राजकीय समस्येच्या संदर्भात लेखन करण्याचा प्रयत्न केला. स्त्रीयांना विविध स्तरावरती येणार्या समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी व व्यापक जनमत जागृत करण्यासाठी पयत्न करण्यात आले. याचबरोबर अनेक मासिकामधून सामाजिक आणि राजकीय प्रश्ना संदर्भात उपाय योजनात्मक लेखन करण्यात येऊ लागले. स्त्री पत्रकारिता ही संभाषणात्मक उत्कट, भावनिक आणि ओरडणे या स्वरुपामध्ये भूमिका व्यवहारात अंमलबजावणी करण्यात आली. कारण स्त्री पत्रकाराचे लिखाण हे स्त्री वाचकांसाठी महत्त्वाचे माणण्यात आले. या काळामध्ये स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढू लागले. त्यामुळे स्त्री पत्रकारांना स्त्रीयांविषयी लेखनाला जागृत स्त्री वाचकवर्ग उपलब्ध होऊ लागला. याचबरोबर औद्योगिकीकरण, शहरीकरण, आधुनिकीकरण या सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया याचा प्रभाव स्त्री जीवनावरती झाल्याचे दिसून येते.

सन १८९४ साली स्त्रीयांसाठी स्वतंत्र मासिक निर्माण करण्यात आले. न्युयार्क मध्ये या मासिका मधून स्त्रीयांच्या संबंधी लेखन करण्यात आले. या मासिका मधून स्त्री पत्रकारणासाठी व्यवसायाच्या संधी उपलब्ध करुन देणे आणि स्त्री वाचक वर्गाचे प्रमाण वाढवणे यासाठी प्रयत्न करण्यात आले. याचबरोबर स्त्रीयांच्या रॉमेन्स विषयीची विशेष लेखन Marie Manning  याच्याकडून करण्यात आले. एकोणिसाव्या शतकामध्ये स्त्री मासिकांचे प्रमाण वाढू लागले. ज्यामध्ये स्त्री शिक्षण आर्थिक गुंतवणूक आणि फॅशन मासिक निर्मिती करण्यात आली. त्यामुळे या काळात स्त्रीयांच्या विविध विषयाचे लेखन करण्यात आले.

विसाव्या शतकात स्त्री पत्रकाराचा अधिक प्रमाण सहभाग नोंदवण्यात आले. यांनी मासिकाच्या माध्यमातून स्त्रीया आणि बालके यांच्या सार्वजनिक आरोग्य सेवा विषयी, प्रश्न विषयीची चर्चा केली. याचबरोबर शिक्षण, जीवन जगण्याचा दर्जा आणि बालमजूर इत्यादी समस्ये विषयीचे लेखन करण्यात आले. याचा उपविषय मध्ये घरविरहीत मुले, कामगार, दवाखाना, रुग्ण याच्या प्रश्नाविषयीची चर्चा केली आहे. शहरी जीवनमान पद्धतीविषयी भौतिक आणि भावनिक प्रश्नाविषयी चर्चा करण्यात आली. स्त्री पत्रकारांना टोपण नाव धारण करुन लेखन केले. Nellie Bly या नावाची Elizabeth Cochrane याची ओळख आहे. त्यांनी औद्योगिक कामगारांच्या प्रश्नासंदर्भात वृत्तपत्रात लेखन केले. तसेच स्त्रीयांना कारागृहात दिलेली वागणूक, वृद्धापकाळात वृद्धआश्रम मध्ये मिळणारी वागणूक, अनाथ आश्रम परिस्थिती, वेड्याच्या इस्पितळातील परिस्थिती इत्यादी विषयी लेखन करण्यात आले.

स्त्रीयांच्या पत्रकारीतेतील सहभाग संदर्भात अनेक नोंदी करण्यात आल्या आहेत. वृत्तपत्राच्या मुख्य पानावरती Front Page Girls म्हणून नवीन ओळख निर्माण केली आहे. विशेषत: गुन्हेगारी बातमीच्या संदर्भातील लेखन करणारी स्त्री पत्रकार साहसी कार्य करत असतील. सन १९०० ते १९३० या कालावधीत स्त्री पत्रकाराचा सहभाग २००० पासून ते १५,००० इतक्या प्रमाणात नोंदवण्यात आला. त्यामुळे स्त्रीयांचा पत्रकारिते मधील वाढता सहभाग आढळून येतो. सन १९३० ते १९४० या काळात Eleanor

Roosevelt यांनी आधुनिक व्यवसाय म्हणून स्त्री पत्रकारितेमध्ये सहभाग नोंदवला. या काळात स्त्री बातम्यांचे प्रमाण अधिक प्रमाणात दिसून येते.

दुसऱ्या महायुद्धाच्या कालावधीत स्त्री पत्रकारांनी बातमी लेखनाची मुख्य भूमिका निभावली. या दुसऱ्या महायुद्धाच्या काळात १२५ महिला पत्रकारांनी सहभाग घेऊन बातम्यांचे सादरीकरणात सहभाग नोंदवण्यात आला. Anne O. Hare यांनी दुसऱ्या महायुद्धात हिटलर मोसोलिन, स्टालीन आणि चर्चिल यांच्या मुलाखती घेण्याचा प्रयत्न केला. Marry Marvin Bechinvide यांनी सर्वप्रथम रेडिओवरती Broadcaste करण्याचे काम केले. या युद्धजन परिस्थितीचे विश्लेषण स्त्री पत्रकार म्हणून अधिक संयम चिकित्सक व वस्तुनिष्ठ पद्धतीने नोंदवण्याचे कार्य केले आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर आकाशवाणी प्रसारणामध्ये वाढ होऊ लागली. या काळात पुरुष पत्रकारांना पत्रकारिका क्षेत्रात कमी करण्यात आले. त्याठिकाणी स्त्रीयांचे प्रमाण वाढत असल्याचे पाहण्यास मिळते. या परिस्थिती हवेच्या माध्यमातून सॅटीलाइट उपग्रहाच्या माध्यमातून प्रक्षेपण कार्य होऊ लागले. या माध्यमातून मनोरंजनाचे कार्यक्रम अधिक प्रमाणात स्त्रीयांच्या सादरीकरणातून होऊ लागले. सन १९७० च्या काळामध्ये पुरुषाच्या वृत्तनिवेदनापेक्षा स्त्री वृत्तनिवेदिकाची मागणी श्रोत्यांकडून करण्यात येऊ लागली. त्यामुळे या प्रसारण प्रकारात स्त्री पत्रकारांचा सहभाग महत्त्वपूर्ण राहिला. या क्षेत्रात Marguerite Higgins, Pauline Frederic and Marlene Sanders या तीन स्त्री पत्रकारांनी यामध्ये सहभाग नोंदवण्यात आला.

सन १९६० ते ७० च्या दशकामध्ये नागरी हक्क आणि सामाजिक दुरत्वाचा विषय समोर येऊ लागला. आफ्रिका, अमेरिका देशातील स्त्री पत्रकारांनी वंश भेदाच्या विरोधात वृत्तपत्रामधून लेखन करण्यास सुरु केली. तेव्हा नागरी हक्काची चळवळ उभारण्यात येऊ लागली. ही चळवळ सामाजिक विषमतेच्या, शोषणाच्या आणि अलगीकरणाच्या विरोधामध्ये कार्य करत होती. आफ्रिकन, अमेरिकन प्रेस मध्ये अनेक स्त्री पत्रकार म्हणून कार्य करत होत्या. त्यांनी गोऱ्या लोकांकडून काळ्या लोकांना मिळणाऱ्या वागणूकी विरोधात लेखन केले. काळ्या लोकांवरील अभ्यासाच्या विरुद्ध जनजागृती व सुधारणात्मक भूमिका घेऊन कार्य केले. या नागरी हक्काच्या प्रश्नावरती Marvel Cooke आणि Charlayne Hunter या स्त्री पत्रकारांनी योगदान दिले आहे.

स्त्रीवादी विचाराचा प्रभाव स्त्री पत्रकारावरती अधिक प्रमाणात पाहण्यास मिळतो. या प्रभावातून स्त्री मासिके स्वतंत्रपणे लेखन संपादन आणि प्रकाशन करण्यात येऊ लागले. या माध्यमातून स्त्रीयांचे विविध प्रश्न कुटुंब विवाह, लैंगिकता, फॅशन जीवनमानाचा दर्जा, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय विषयावरती सखोल चर्चा होऊ लागली. स्त्री-पुरुष समानता, बंधुता, न्याय आणि सन्मान इत्यादी मुल्याची जपणूक करणारी स्त्री पत्रकारिता समोर येऊ लागली. याबरोबरच दारिद्र, बालके, निरक्षरता, स्त्री चळवळ इत्यादी विषयी चर्चा करण्यात येते. यामध्ये Eliza Holbrook Nicholson आणि Eleanor Cissy Patterson या स्त्री पत्रकारितेने यामध्ये योगदान दिले आहे. स्त्री पत्रकारितेमधील सहभागाने स्त्रीवादी चळवळीत वाढ करण्यात आली. या स्त्रीयांना

पत्रकारितेचा सार्वजनिक स्तरावरती वापर करुन व्यवस्था परिवर्तनाचे सामुदायिक कार्य केले.

सन १९९० च्या नंतरच्या काळात स्त्रीयांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात नेतृत्वाची भूमिका निभावली. सन १९९३ साली Barbara Walters यांनी पुरुष पत्रकारांना मिळणाचे कामाच्या वेतना इतकेच समान वेतन स्त्री पत्रकारांना मिळावे. यासाठी स्वतंत्र मागणी केली. त्यानुसार स्त्री पत्रकारांना समान वेतनाचा अधिकार मिळवून देण्यात आला. त्यांनी स्त्री पत्रकारांच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

सध्य काळामध्ये स्त्री पत्रकार आपले व्यावसायिक क्षेत्रात स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. स्त्री पत्रकारांना विविध माध्यमातून व्यवसायाच्या संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या माध्यमातून टी.व्ही. माध्यमावरती स्त्री पत्रकार अधिक प्रमाणात पत्रकारिता करत आहेत. विकसित देशात स्त्री पत्रकारिता ३०... ते ४०... टक्के इतक्या प्रमाणात असे जरी असते तरी माध्यमामध्ये पुरुष पत्रकारांचे प्रमाण अदिक प्रभूत्वशाली आहे. त्यामुळे स्त्री पत्रकारितेला अपेक्षित संधी प्राप्त होत नाही. परिणामी स्त्री पुरुष समानतेचे मुल्य जपता येत नाही. स्त्री पत्रकारिता ही खेळाच्या पत्रकारितेत अधिक सहभाग होतात. यासोबत परदेशी पत्रकारितेमध्ये कार्य करण्याचे आव्हान स्वीकारला आहे. अनेक क्षेत्रात स्त्रीया आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करत आहेत.

स्त्री पत्रकारितेच्या विकासाचा आलेख हा अधिक विकसित होताना पाहण्यास मिळतो. स्त्रीयांना या क्षेत्रामध्ये आपल्या कौशल्य आणि व्यक्तिमत्त्वाचे सादरीकरण करण्यात येताना दिसून येते. नव तंत्रज्ञानाचा विकास होताना स्त्रीयांना कामाच्या संधी उपलब्ध होत आहे. इंटरनेटच्या माध्यमातून स्त्रीया बातमीचे सादरीकरण करण्यामध्ये अधिक सहभाग नोंदवण्यात येतो. डिजीटल माध्यमांचा अधिक प्रमाणात वापर होत आहे. त्यामुळे स्त्री पत्रकारितीचे स्वरूप बदलत आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्त्री पत्रकारितेच्या वरती दृष्टिक्षेप लिहा.

## २अ.५ पत्रकारिता क्षेत्रातील स्त्रीयांच्या समस्या (PROBLEMS OF WOMEN IN JOURNALISM)

**प्रस्तावना (Introduction) :**

आधुनिक प्रसारमाध्यमाच्या काळामध्ये स्त्रीयांचा पत्रकारितेच्या व्यावसायिक भूमिका अधिक प्रमाणात आढळून येतात. त्यामुळे स्त्रीयांचे पत्रकारितेच्या क्षेत्रात विविध स्तरावरती आपले स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे स्त्रीयांना पुरुष पत्रकाराच्या सोबत काम करताना पाहण्यास मिळते. या क्षेत्रात बातमीदारी, मुलाखत, संपादकीय, जाहिरात आणि मनोरंजन इत्यादी विविध क्षेत्रात काम करतात. असे जरी असले तरी या क्षेत्रात

स्त्रीयां काम करत असताना लिंगभाव आणि पुरुषसत्ता भांडवली राजकीय सत्ताकारण यांच्याकडून प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या विविध शारीरिक, मानसिक, लैंगिक आणि कामाच्या ठिकाणच्या परिस्थितीनुसार होणार्या अत्याचारांना बळी पडण्याचा प्रमाण उघडकीस येत आहे.

International Women's Media Foundation (IWMF) आंतरराष्ट्रीय स्त्री माध्यम संघटना यांनी स्त्री पत्रकाराच्या विविध समस्येविषयी आवाज उठवला आहे. स्त्री पत्रकारानंवरती होणाऱ्या अन्यायाबाबत या क्षेत्रातील स्त्रीया स्पष्टपणे बोलण्यास भितीपोटी घाबरुन जातात. कारण या क्षेत्रामध्ये पुरुषाच्या वर्चस्वाला बळी पडण्याचे प्रमाण अधिक आहे. या क्षेत्रात स्त्री पत्रकार कार्य करत असताना लिंगभाव आधारित दुय्यमत्व वर्चस्व आणि शोषणाला कामाच्या ठिकाणी जावे लागते. वरिष्ठ संपादक बातमीदार कार्यालयीन व्यवस्थापक या कडून अन्याय अपमानास्पद वागणूक या सारखे अनेक अतिप्रसंगाला सामोरे जावे लागते. या सर्वेक्षणा मधून वरील स्त्री पत्रकाराच्या समस्यांना सामारे जाताना पाहण्यास मिळाले.

**स्त्री पत्रकाराच्या विविध समस्या :**

स्त्री पत्रकारितीच्या विविध समस्येविषयी अनेक संशोधक पत्रकार संघटना आणि अभ्यासक यांच्या सर्वेक्षणामधून विविध मुद्दे यासंबधी नोंदवण्यात आले आहेत. ते पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) लिंगभाव (Gender) :**

जागतिक आणि स्थानिक स्तरावरती स्त्री पत्रकारांची ओळख लिंगभावाच्या आधारित केली जाते. या लिंगभावाचा अर्थ स्त्री-पुरुष भेदभाव असा आहे. लिंगाच्या आधारे स्त्री-पुरुषाचे वर्चस्व भेदभाव आणि शोषणाचे स्वरूप निर्धारित होते. त्यामुळे समाजात असमानता हे शोषणाचे कारण म्हणून समोर येते. ते पत्रकारितेच्या व्यावसायिक क्षेत्रात पाहण्यास मिळते. या क्षेत्रात स्त्री पत्रकारांना लिंगभाव आधारित तिरस्कार, मान-अपमान आणि हल्ले यांसारख्या अत्याचाराना सामोरे जावे लागते. त्यांच्या सुरक्षित समस्या अधिक प्रमाणात आहे. त्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि मानवी हक्काच्या प्रश्नांशी संघर्ष करावे लागते. या पत्रकाराच्या अधिक प्रमाणात हत्या झाल्याचे दिसून आले. विशेषत कलम १९ प्रमाणे स्त्री पत्रकाराना अधिकार प्राप्त होत नाही. त्यामुळे स्त्री पत्रकारांचे मत विचार कृती आणि नियंत्रणा संबंधीचे अधिकार, प्रतिनिधित्व नाकारण्यात येतात. तसेच कामाच्या ठिकाणी होणारे अत्याचार अधिक प्रमाणात दिसून येतात. हे सर्व अत्याचार स्त्री पत्रकाराना केवळ लिंगभावाच्या आधारे अधिक स्पष्ट होतात.

**२) सामाजिक समस्या (Social Enequality) :**

स्त्री पत्रकारांना सामाजिक असमानतेच्या पार्श्वभूमिवर अनेक स्वरुपाच्या असमानतेला सामोरे जावे लागते. स्त्री पत्रकारीतेच्या व्यवसायात काम करत असताना ती कोणत्या पार्श्वभूमीतून आली आहे याचा परिणाम तिच्यातील गुणवत्ता कार्यक्षमता आणि व्यवस्थापन यांच्याशी संबंधीत आहे. या स्त्रीयांच्या पार्श्वभूमीत लिंग, भाव, वंश, रंग, जात,

परिस्थिती इत्यादी अनेक गोष्टी संबंधीत आहेत. या सर्व घटकाचा परिणाम त्या स्त्रीयांना मिळणारा दर्जा, भूमिका, सन्मान, मान-अपमान, तिरस्कार, अत्याचार आणि जीवघेणे हल्ले यांच्याशी संबंधीत आहे. या पार्श्वभूमीवर या स्त्रीया अनेक समस्यांना सामोरे जात आहे.

**३) स्त्री पत्रकारांच्या सुरक्षितता (Security of Women Journalist) :**

व्यावसायिक पत्रकारितेमध्ये कार्यरत असणार्या स्त्री पत्रकारितेच्या सुरक्षिततेची समस्या अधिक गंभीर बनत जात आहे. Article १९ प्रमाणे स्त्री पत्रकारांना सुरक्षितता देण्यात आली आहे. तरी स्त्री पत्रकारांना सुरक्षिततेच्या समस्यांना सामोरे जावे लागते. Article 19 प्रमाणे स्त्री पत्रकारांना सुरक्षितता, समान संधी, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, अभिव्यक्ती, स्वातंत्र्य, संघटनात्मक समस्या इत्यादी विषयीची सुरक्षितता देण्यात कार्यालयीन कामाच्या ठिकाणी स्वतंत्र अवकाश आणि संधीची सुरक्षिततेला अधिक महत्त्व आहे. कारण स्त्री पत्रकारांना बातमी निर्मिती करताना वरिष्ठाचे वर्चस्व, दबाव, नियंत्रणला सामोरे जावे लागते. तेव्हा अभिव्यक्ति स्वातंत्र्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. स्त्री पत्रकाराच्या सोबत कार्य करताना पुरुष पत्रकाराचे वर्चस्व अधिक असते. तसेच कार्यालया बाहेरील राजकीय भांडवली, गुंडशाही चे हल्ले अधिक होतात. त्यांना अपहरण, अमानवी, अश्लील, शीवीगाळ, वागणूक, तिरस्कार, बलत्कार, हल्ले इत्यादी मुळे स्त्री पत्रकारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**४) लिंगभाव दृष्टिकोणाकडे दुर्लक्ष (Neglected Gender Sensitive Approach) :**

स्त्री पत्रकारांना लिंगभावाच्या आधारे कनिष्ठ व पुरुषी वर्चस्व आणि भांडवली शोषणाला सामोरे जावे लागते. स्त्री पत्रकारांना अनेक समस्यांना बळी पडत असताना लिंगभाव जाणीव दृष्टीकोनाकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. या क्षेत्रातील स्त्रीयांना समान संधी आणि सन्मानाची आवश्यकता आहे, पण ती प्रत्यक्षामध्ये व्यवहारिक स्तरावरती वर्तन व्यवहारातून दिसून येत नाही. त्यामुळे त्याच्या सुरक्षिततेच्या संदर्भातील प्रश्नांची गुंतागुंत अधिक वाढताना दिसते. त्यामुळे त्यांच्यातील गुण, कौशल्य, धाडस, आत्मविश्वास यांचे खच्चीकरण करण्यात आल्याचे दिसून येते.

**५) मानव अधिकाराचे उलंघन (Decling Human Rights) :**

प्रत्येक व्यक्तीला तिच्या मानवी अधिकाराचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे. तसेच स्त्री पत्रकारांना मानवी अधिकाराचे अपेक्षित संरक्षण प्राप्त करुन देणे आवश्यक आहे. पण प्रत्यक्षात मात्र व्यवहारात होत नाही. त्यामुळे स्त्री पत्रकारांना मानवी अधिकाराचे संरक्षण मिळत नाही. स्त्री पत्रकार प्रत्यक्ष क्षेत्र कार्यावरती काम करत असताना अनेक समस्येला सामोरे जावे लागते.

### ६) कामाच्या ठिकाणची परिस्थिती (Condition of Work Place) :

स्त्री पत्रकारांना विविध स्तरावरती कार्य करावी लागतात. यामध्ये कार्यालयीन कार्य प्रत्यक्ष क्षेत्रामध्ये शासकीय स्तरावर जावून कार्य करावी लागतात. स्त्री पत्रकारांना बातमीचे संकलन, संपादन आणि सादरीकरण इत्यादी स्वरूपाची कामे करावी लागतात. तेव्हा त्यांचे बरे वाईट अनुभव येत असतात. स्त्री पत्रकारांना कामाच्या ठिकाणी वरिष्ठ अधिकार्याकडून अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होताना दिसतात. या क्षेत्रात वरिष्ठ संपादक, बातमीदार, व्यवस्थापक सोबत काम करत असताना शारीरिक, मानसिक आणि लैंगिक समस्येना सामोरे जावे लागते. कामाच्या ठिकाणी स्त्री पत्रकारांना लैंगिक, शाब्दिक अत्याचार, लैंगिक इशारे, नको वाटणारा स्पर्श, अश्लिल चाळे, बलत्कार इत्यादी सारख्या समस्यांना सामोरे जावे लागते.

### ७) बढती कमी वेतन (Promotion and low wages) :

स्त्री पत्रकारांना पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करताना योग्य बढ़ती आणि पगार मिळणे आवश्यक आहे पण केवळ स्त्री आहे म्हणून पुरुष पत्रकारापेक्षा बढती आणि वेतनामध्ये तफावत करण्यात येते. त्यामुळे स्त्री पत्रकाराना दुय्यमतवाची वागणू मिळताना दिसून येते. स्त्री पत्रकार पुरुष पत्रकाराच्या बरोबरीने कार्य करतात. त्यापेक्षा अधिक धाडसाचे सहसी, ध्यैर्याने आणि कौशल्याने काम करुन ही स्त्री पत्रकारांना दुय्यमत्वाची वागणूक पुरुषी अधिकार्यांकडून केले जाते त्यामुळे स्त्री पत्रकारांना बढती आणि कमी वेतनाच्या समस्यांना सामोरे जावे लागते.

### ८) स्त्री पत्रकारावरील हल्ले (Attacks on Women's Journalists) :

स्त्री पत्रकारांची प्रामुख्याने त्यांच्यावरती होणारे हल्ल्याच्या समस्यांना सामोरे जावे लागते. स्त्री पत्रकार म्हणून काम करत असताना सामाजिक सत्य आणि न्यायाच्या भूमिकेतून कार्य करत असताना पुरुषी राजकीय भांडवली वर्चस्वाच्या आधारे स्त्री पत्रकारांवरती हल्ले केले जातात. यामध्ये स्त्री पत्रकाराचे अपहरण करणे शारीरिक इजा करणे, जीवघेणा हल्ला प्रसंगी मृत्यूला सामोरे जावे लागते. त्यामुळे स्त्री पत्रकाराच्या सुरक्षेबाबतची समस्या अधिक स्पष्ट दिसते. सन २०१७ साली Committee to Protect Journalists याच्या सर्वेक्षणानुसार ४२ पत्रकारांना हल्ल्यामध्ये मृत्यूला सामोरे जावे लागले. सन २०१६ च्या UNESCO'S यांच्या सर्वेक्षणानुसार ३८ स्त्रीयांच्या खून करण्यात आला. या वरुन स्त्री पत्रकारांवरील होणाऱ्या हल्ल्याचे प्रमाण समजुन येते.

### ९) इंटरनेट माध्यमातून छळ (Online Harassment) :

नवीन माध्यमांचा पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये अधिक प्रमाणात वापर होत आहे. त्यामुळे पत्रकारिता अधिक विकसित आणि गतीशील होत आहे असे असले तरी स्त्री पत्रकारांना इंटरनेटच्या माध्यमांचा वापर करुन छळाला सामोरे जावे लागते असे अनेक सर्वेक्षणातून दिसून आले. Pew Research Center यांच्या सर्वेक्षणानुसार युनायटेड स्टेट मधील तरुण मुलांनी इंटरनेटचा वापर करुन स्त्रीयांचा अमानवी स्वरूपात लैंगिक छळ केल्याचे

आढळून आले. स्त्री पत्रकारांमध्ये २ लाख स्त्रीयांना या इंटरनेटच्या माध्यमातून लैंगिक छळाला सामोरे जावे लागले. यामध्ये स्त्री पत्रकारांना अधिक प्रमाणात Dismissire Trolling करण्यात आल्याचे आढळून आले. यासंबंधी International Federation of Journalists and South Asia Media Solidarity Network या संघटनाच्या माध्यमातून स्त्री पत्रकारांना Online Harassment विषय Byte Bact ही मोहीम उभारण्यात आली. तसेच Organization for security and cooperation in Europe (OSCE) या संघटनेने स्त्री पत्रकारांच्या Online Harssment प्रश्नांवरती चर्चास्त्र आयोजन करुन स्त्री पत्रकारांच्या या प्रश्नावरती कार्यात्मक जनजागृती करण्यात आली.

स्त्री पत्रकारांना पत्रकारितेच्या व्यवसायात अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. स्त्री पत्रकारांवरती होणारे हल्ले, अत्याचार, छळ, अपहरण, बलत्कार, लैंगिक अत्याचार, कामाच्या ठिकाणी होणारे अत्याचार अशा अनेक समस्यांना सामोरे जाताना पाहण्यास मिळते. नवीनच Me to च्या प्रकरणाला स्त्री पत्रकारांना समस्या म्हणून सामोरे जावे लागत आहे. यासंबंधी योग्य पद्धतीने समस्या सोडवण्यासाठी विविध स्तरावरती प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्त्री पत्रकारांच्या विविध समस्येवरती सविस्तर विश्लेषण करा.

## २अ.६ स्त्री पत्रकारांच्या समस्यांवरील उपाययोजना (SOLUTION ON WOMEN JOURNALIST ISSUES)

पत्रकारिकता क्षेत्रात स्त्री पत्रकारितेच्या वाढत्या समस्ये संबंधी विचार केला असता त्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते. स्त्री पत्रकारांना या प्रश्नांवरती स्वतंत्र काम करणे आवश्यक आहे. असे यासंबंधी विविध अहवाल सर्वेक्षण संशोधन मधून दिसून आले आहे. याविषयी उपाययोजना करणे आवश्यक आहेत त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) लिंग भेदभाव नकार (Regecting Gender) :**

स्त्री म्हणून पत्रकारिता व्यवसायाच्या क्षेत्रात करत असताना त्यांना लिंगभाव आधारे वागणूक दिली जाते. म्हणून स्त्री पत्रकारांचे स्थान हे पुरुष पत्रकारांपेक्षा दुय्यम कमी महत्त्वाचे दर्जा कमी अपेक्षाचा प्रमाण जबाबदारी कमी अशाप्रकारे लिंग भाग केला जातो. या प्रकारची स्त्री पत्रकारांना मिळणारी वागणूक ही अमानवी आहे. ती नाकारुन स्त्री पुरुष समानता स्वातंत्र आणि सन्मान मूल्याची जपणूक करता यावी असा व्यवहार अपेक्षित आहे. तरच स्त्री पत्रकारांना लिंगभाव समस्या सोडवता येईल.

munotes.in

### २) स्त्री पत्रकारांकडे पाहण्याचा दृष्टीकोनात बदल (Changing Prespective of Womens Journalist) :

स्त्री पत्रकारांकडे पाहण्याचा दृष्टीकोणाची समस्या पुरुषी वर्चस्व जात कौटुंबिक पार्श्वभूमी, जात, वंश, रंग, शिक्षण व व्यवसाय इत्यादी आधारित पाहिले जाते. यामुळे स्त्री पत्रकारांना दुय्यमत्व, असबळ, निष्क्रीय अवलंबी या ही दृष्टीने पाहण्यात येते. तेव्हा त्या दृष्टीकोनामध्ये परिवर्तन होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने कार्य केले पाहिजे.

### ३) कामाच्या ठिकाणचे चांगले वातावरण (Good Environment in Work Place) :

स्त्री पत्रकार कामाच्या ठिकाणी योग्य परिस्थिती असेल तरच कार्य करु शकतात. स्त्री पत्रकारांना कामाच्या ठिकाणी सन्मानाची वागणूक मिळणे गरजेचे आहे. कार्यालयात काम करत असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या अत्याचार विशिष्ठ आवाज उठविणे आवश्यक आहे. तसेच कामाच्या ठिकाणी पुरुष पत्रकारांना स्त्री पत्रकारांना सन्मानपूर्वक वागणूक देण्यासाठी लिंगभाव जाणीव जागृती करणे आवश्यक आहे. तसेच उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात यावी.

### ४) बढती आणि वेतन वाढ करणे (Promotion and Increasing Payment) :

स्त्री पत्रकार ही स्वत: पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करत असते. तेव्हा तिच्या कौशल्य प्रामाणिकता कर्तव्यनिष्ठा जबाबदारी इत्यादींच्या आधारे बढती आणि वेतन वाढ करणे आवश्यक आहे. स्त्री पत्रकारांना पुरुष पत्रकारां इतकेच समान कामाचे समान वेतन पदोन्नती सुरक्षा सुविधा प्रदान करणे आवश्यक आहे तरी स्त्री पत्रकारांना आपली प्रगती करता येईल.

### ५) कायद्याची अमंलबजावणी (Implimenting Law):

स्त्री पत्रकारांच्यावरील वाढत्या अत्याचाराच्या परिस्थिती नियंत्रीत आणण्यासाठी कायद्याची योग्य अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. स्त्री पत्रकारांवरती होणारे विविध स्वरूपाचे अत्याचार रोखण्यासाठी पोलीस प्रशासन कायदा सुव्यवस्था आणि न्यायालयीन यंत्रणेच्या माध्यमातून कायद्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. स्त्री पत्रकारांवरती होणार्या अत्याचाराचे स्वरूप समजून घेऊन पोलीस प्रशासनामार्फत गुन्हेगारावरती योग्य कार्यवाही करण्यात यावी तसेच कायदे मंडळा मार्फत न्यायालयीन निवाडे निकालात काढून न्यायाची अंमलबजावणी करावी लागेल.

### ६) शासकीय सेवा पुरवठा (Providing Government Service) :

स्त्री पत्रकारांना शासकीय सेवांचा पुरवठा करणे आवश्यक आहे, त्यांना प्रवास निवास दैनंदिन सुविधांच्या स्वरूपात शासकीय सेवांचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

वरील सर्व उपाययोजनांची स्थानिक स्तरावरती अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्त्री पत्रकाराच्या समस्या दूर करण्यासाठी उपाययोजना सूचवा.

## २अ.७ सारांश (SUMMARY)

आधुनिक काळामध्ये पत्रकारितेचे स्वरूप विकसित आणि गतिशील होताना पाहण्यास मिळते. विशेषत: स्त्री पत्रकारांचा या क्षेत्रामध्ये वाढता सहभाग ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. या क्षेत्रामध्ये स्त्रीया पत्रकार म्हणून गुणवत्ता कौशल्य आणि व्यवस्थापिक व्यक्ति महत्त्वाचा स्वरूप आपले स्वतंत्र स्थान आणि अस्तित्व निर्माण करत आहेत. त्यामुळे या स्त्रीया पुरुष पत्रकाराच्या बरोबरीने आपल्या भूमिका निभावत आहेत. त्यामुळे नव्या आव्हानाना सामोरे जात आहेत. स्त्री पत्रकारांना पुरुषी सत्तेच्या दृष्टिकोनातून पाहण्याचे वर्चस्वाच्या स्वरूपात पाहिले जाते. त्यामुळे लिंगभावाचे स्वरूप अधिक व्यावहारिक स्वरूपात समस्या म्हणून समोर येते. त्यामुळे स्त्री पत्रकाराच्या मानवी अधिकाराचा प्रश्न म्हणून सुरक्षिततेच्या संदर्भात पाहण्यास मिळतो. यासंबंधी अनेक अभ्यासक संशोधक आणि संशोधन संस्थांच्या सर्वेक्षणामधून आढळून आले आहे तसेच आधुनिक तंत्रज्ञान इंटरनेट यांचा चुकीच्या स्वरूपात वापर केल्यामुळे स्त्री पत्रकाराच्या नव्या प्रश्नामध्ये वाढ होत आहे. या प्रश्नासंबंधी सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे.

## २अ.८ प्रश्न (QUESTIONS)

१) स्त्री पत्रकारितेची संकल्पना सांगून स्वरूप स्पष्ट करा.

२) स्त्री पत्रकारितेच्यावरती दृष्टीक्षेप सविस्तर लिहा.

३) स्त्री पत्रकारितेच्या समस्या आणि उपायाविषयी सविस्तर लिहा.

## २अ.९ संदर्भ ग्रंथ (REFERENCES)

1) Marion Marzolf, 1977, Up from the rootnote : A History of women journalist, Hastings House.

2) Madelon Golden Schilpp : Murphy S.M. 1983, Great Women of the Press, Souther Illionis University Press.

3) Kathleen A Cairns, 2003, Front Page Women Journalist 1920-1950. University of Nebraska Press.

4) D.W. Deborah Chambers. Linda Steiner Carola Flems. 2004 Women and Journalism, Routledge Publication.

❖❖❖❖

# ३

# उद्योजकतेचा अर्थ भूमिका कौशल्या
# Entrepreneurship Meaning

**अभ्यासाचे घटक**

३.० अभ्यासाचे उद्देश्य

३.१ प्रस्तावना

३.२ उद्योजकाचा अर्थ संकल्पना

३.३ उद्योजकाच्या भूमिका व कार्ये

३.४ उद्योजकांसमोरील आव्हाने

३.५ उद्योजकांचे गुण व कौशल्ये

३.६ सारांश

३.७ अभ्यासाचे प्रश्न

३.८ संदर्भग्रंथ सुची

## ३.० अभ्यासाचे उद्देश

- उद्योजकाचा अर्थ व संकल्पनांची ओळख करून देणे.
- उद्योजकांच्या उद्योगासंबंधी कार्ये आणि भूमिकांचा आढावा सांगणे.
- उद्योजकांच्या समोरील विविध आव्हानांचे विश्लेषण करणे.
- उद्योजकाच्या गुण-कौशल्य स्पष्ट करणे.
- नविन उद्योजकांची निर्मिती होणे.

## ३.१ प्रस्तावना

उद्योग व व्यवसाय ही संकल्पना तशी जुनी आहे. पण जगातील औद्योगिक क्रांती नंतर स्वरूप पूर्णपणे बदलते आहे. पूर्वी कुटुंबातच कारागीरी पद्धतीने उत्पादन केले जात होते. यांचे प्रमाण नगण्य स्वरूपाचे होते. काळाच्या ओघात व्यापारी प्रणाली हळूहळू विकसीत होत होती. याचा परिणाम उत्पादने प्रक्रियेवर होत होते. .जगात औद्योगिक क्रांती नंतर जगात व्यापारी क्षेत्रात अधिक विकास झाला. ज्या देशाचे उद्योग विकसीत झाले ने देश

munotes.in

विकसीत देश म्हणून उदयास आले आहेत म्हणून देशाचा विविध स्वरूपाच्या उद्योगाचा विकास महत्त्वाचा असतो.

असे विविध उद्योगांच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बनवणारी व्यक्ती म्हणजे उद्योजक होय. कारण उद्योजकाशिवाय उद्योगाची स्थापना होत नाही. जोपर्यंत व्यक्तीच्या मनात उद्योग स्थापनेचा विचार निर्माण होत नाही तोपर्यंत उद्योग निर्माण प्रक्रिया सुरू होत नाही. म्हणून त्या स्वरूपाचे पोषक वातावरण पण असल्याशिवाय व्यक्ती उद्योग स्थापनेकडे विचार करत नाही.

भारतीय समाजात नविन उद्योजक निर्माण होणे आवश्यक आहे. यासाठी नविन व्यक्तीने पुढे येणे गरजेचे अशा यासाठी मागणारे इच्छाशक्ती निर्माण करण्याच्या उद्देशाने हा पाठ अभ्यासाला दिला आहे. समाजाच्या प्रत्येक घटकातून उद्योजक निर्माणासाठी लागणार्या गोष्टीची ओळख प्रस्तुत पाठात केली आहे.

## ३.२ उद्योजकाचा अर्थ संकल्पना

समाजाला आवश्यक असणाऱ्या गरजा पुर्ण करण्यासाठी एखादी व्यक्ती विशिष्ट स्वरूपाची प्रक्रिया करते. शमाजातील अशी व्यक्ती जी धोका पत्करून व अनिश्चितता स्विकारून आपल्या मनातील ध्येये व स्वप्न परिपूर्ण करण्यासाठी जे प्रयत्न करणे होय.

मानवी समाजाला चालू गरजा आणि भविष्यातील गरजांचा विचार करून त्यापैकी एखादी गरज पुर्ण करण्याकरीता नियोजन पद्धतीने क्रिया करणे, उद्योजकांना नेतृत्त्व कौशल्य आणि संघटन कौशल्याच्या आधारे आपले उद्दीष्ट्ये पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा लागतो. असे प्रयत्न करणारी व्यक्ती म्हणजे उद्योजक होय. अशा उद्योजक किंवा संयोजक या संबंधी काही विचारवंतानी दिलेल्या महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) मार्शल यांच्या मते 'जबाबदारी स्विकारून जोखीम पत्कारणारी व्यक्ती उत्पादन, नियोजन, पर्यवेक्षण अशी संघटने संबंधीची सर्व कामे पार पाडणारी व्यक्ती म्हणजे उद्योजक होय."

२) पीटर ड्रकर यांच्या मते, 'संयोजक म्हणजे अशी व्यक्ती जी सतत होणार्या बदलांचा शोध घेऊन त्यांचा पाठपुरावा करते. म्हणजेच संयोजकासमोर आलेल्या व्यावसायिक संधीचा उपयोग करून घेताना त्यासाठी विविध व्यावसायिक संधीचा उपयोग करून घेतात. त्यासाठी वेगवेगळ्या व्यावसायिक प्रारंभ करतात."

३) जे. बी. से यांच्या मते, 'संयोजक हा एक तसा समाजाचा प्रतिनिधी असतो. जो व्यवसाय उद्योगधंद्याला लागणार्या सर्व संसाधनांची उजळणी करतो. व विविध उत्पादन घटक वापरून भ्रमांचा आणि भांडवलांचा योग्य तो उपयोग करून वस्तूचे उत्पादन व सेवांची पुर्तता करण्यास सकारात्मक कृती करतो."

४) प्रा. सर्जेराव बोराडे यांच्या मते, 'विशिष्ट वस्तू-सेवांच्या गरज पुतीच्या उद्देशाने स्थापन केलेल्या औद्योगिक संघटनेच्या नियोजन समयोजन मार्गदर्शन संयोजन आणि नेतृत्त्व करणार्या व्यक्तीला उद्योजक किंवा संयोजक असे म्हणतात.

**उद्योजकता संकल्पना**

एखादी व्यक्ती नवे आर्थिक साधने हाती घेण्यासाठी एखादा उपक्रम ज्यास इंग्रजीमध्ये Enterprise शब्दप्रयोग केला जातो. अशा उद्योगाची निर्मिती करण्यासाठी योजनाबद्ध कार्य करतो अशा व्यक्तीसाठी उद्योजकता (Entrepreneur) असे म्हणतात. जॉन काओ यांनी उद्योजकतेची संकल्पनात्मक मांडणी केली आहे. उद्योजकते मध्ये जोखीम पत्कारण्याची क्षमता, संघटनांची कौशल्य आणि उद्योगास विविध निर्माण करणे व नवनिर्मिती करण्याची प्रबळ इच्छा असणे गरजेचे असते. ड्रकर यांच्या मते उद्योजकता केवळ मोठे उद्योग किंवा आर्थिक संस्था पर्यंतच मर्यादीत नसते तर ती लघुउद्योग किंवा इतर आर्थिकतर संस्थामध्ये पण तितकीच महत्त्वाचे असते. त्यांनी उद्योजकताचे एक प्रारूप सांगितले आहेत. व्यक्ती, कृती पर्यावरण आणि संघटन यांचा विशिष्ट संबंधातून उद्योजक उदयास येतो.




यामध्ये उद्योजकांना जोडणार्या व्यक्ती कृती, पर्यावरण आणि संघटन यांचे संबंध पण एक दुसऱ्याशी असतात पण या सर्वांना जबाबदार उद्योजक असतो.

उद्योजक हा गुंतवणूक आणि उत्पादन संबंधीची संधीच्या शोधात असतो. उद्योग व्यवसायात नवनवीन उत्पादन प्रक्रिया घडवून आणण्यासाठी उत्पादन संघटन करणे, भांडवली उभारणी करणे, कामगारांच्या नियुक्त्या करणे, कच्च्या मालाच्या पुरवठ्यांची योग्य सोय करणे. उद्योगासाठी जागाचे शोध घेणे. नवीन यंत्र व तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन करणे, कच्च्या माला करीता नवीन संसाधने माहिती करणे. उद्योग व्यवसायात दैनंदिन व्यवस्थापन करण्यासाठी उच्च गुणवत्तेच्या व्यवस्थापकांची नियुक्ती करून या सर्व बाबीचे समन्वय साधणे या सर्व जबाबदारी पूर्ण व्यक्तीला उद्योजक म्हणून ओळखले जाते.

**उद्योग व उद्योजक यातील फरक**

अनेकदा उद्योग व उद्योजक यामध्ये सारखे पण दिसत असले तरी यात विशिष्ट पद्धतीचे प्रकारचे फरक आहे याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

### अ) स्वरूप

सर्वसाधारणपणे उद्योग, कारखाने, व्यवसाय, कंपनी ह्या संस्था आहेत. त्या विशिष्ट इमारत किंवा स्थानावर वसलेल्या असतात. मात्र उद्योजक किंवा संयोजक ही एका व्यक्ती मध्ये असणारी मानसिक प्रक्रिया आहे. उद्योगातील वस्तू साधना प्रमाणे निर्णय व धोरणे ठरविणे या बाबी साधन स्वरूपात दिसत नसल्या तरी त्या संयोजकाच्या कृती मधून दिसत असतात. सामान्यपणे उद्योजक ही एक व्यक्ती असते. जी उद्योजकाला पुर्ण कार्यान्वित करत असते.

### १) व्याप्ती

विविध स्वरूपाच्या वस्तू व सेवा निर्मितीसाठी उद्योगांची स्थापना होत असते. उद्योगाचा मुख्य उद्देश वस्तू व सेवांची निर्मिती करून नफा कमवणे हाच असतो. उद्योग विविध स्वरूपाचे असले तरीही उत्पादन कार्य करणे एवढी व्याप्ती मर्यादीत असते. परंतु उद्योजकता या घटकांची व्याप्ती व्यापक असते. व्यवसायिक संधी या घटकांची मर्यादीत नाही. उद्योजकांच्या मनात विविध भावना असतात त्यांची ते पुर्तता करण्याची व्यापक स्तरावर कार्यरत असतो.

### २) प्रकार

उद्योगांचे अनेक प्रकार असतात. कुटीर उद्योग, लघु उद्योग, मोठे उद्योग साखळी उद्योग एकाच प्रकारचे अनेक उद्यागे असतात. उदा. तांत्रिक, परंपरागत, आर्थिक स्थिती, शिक्षण, स्त्री-पुरूष वगैरे प्रकार उद्योग असतात.

### ३) उद्देश

उद्योगात कारखाने व यांत्रिकीकरण यांचे ध्येय, विशिष्ट वस्तूची निर्मिती करण्याचे असतात. व्यवस्थापकाने ती उत्पादन उद्दिष्टे ठरवून दिलेली असतात. ती साधने करण्यासाठी औद्योगिक संस्था कार्य करते. परंतु उद्योजकांची ध्येय स्वतःसाठी व समाजासाठी रोजगार निर्माण करणे व वस्तू सेवांचा पुरवठा करणे या शिवाय आधुनिकीकरण करून उद्योगाचा विस्तार करणे हा उद्देश असतो.

## ३.३ उद्योजकांच्या भूमिका व कार्ये

उद्योजक हा उद्योगाचा सर्वेसर्वा असतो. म्हणून उद्योगात उत्पादन वाढ करून उद्योगाचा सर्वांग विकासाच्या दृष्टिने महत्त्वाच्या तीन भुमिका पार पाडाव्या लागतात. त्या पुढील प्रमाणे आहेत.

### १) नव निर्मितीची भूमिका

उद्योजक नवनव्या संधीचा शोध घेण्यास आणि त्या मिळवून त्यांचा जास्तीत जास्त उत्कृष्ट पद्धतीने उपयोग करून उद्योजकांची सर्व कौशल्य दाखवण्याची भूमिका साकारावी लागते. उद्योगधंद्यात व्यवस्थापकांची सर्व कार्ये समाविष्ट असतात. परंतु या

शिवाय त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटलेला असतो. ते सर्वात महत्त्वाचे असते. नवनवीन कल्पना सतत मनात निर्माण होत असतात. ग्राहकांच्या गरजा कोणत्या आहेत हे ओळखण्याची क्षमता असते. म्हणून तो त्या ग्राहकांचे समाधान करू शकतो. अशाच वस्तूचे उत्पादन करतो. निर्माण होणार्या वस्तू प्रत्येक कोळी नविन स्वरूपाच्या असतील असे नाही. पण वस्तू उत्पादनाकरीता वापरलेला माल, निर्मिती पद्धती यामध्ये नाविन्य असते. वस्तू वितरण पद्धती नवीन असते. विक्रीनंतर देणाऱ्या सेवामध्ये नाविन्य असते. अशा पद्धतीने नविन स्वरूपाची निर्मिती करून ग्राहक राजाला आकर्षित करण्याची भूमिका उद्योजकाला पार पाडावी लागते.

### २) धोका पत्करण्याचे धाडस

उद्योजकांना उद्योगात अधिक प्रमाणात धोका पत्करण्याचे धाडस करावे लागते. या धाडसा बरोबर पुढील परिणामांची कल्पना असते. तरी ही होणार्या परिणामाची पर्वा न करता स्वतःला झोकून द्यावे लागते. कोणताही उद्योग सुरू करणे हे पण मोठे धाडस असते. कारण अशा निावन उद्योगाला सतत अपयश येण्याची शक्यता असते. व्यवसायासाठी गुंतवणूक केलेले भांडवल म्हणजे एक बुडवणूक किंवा जुगार असतो. कारण उद्योगातून फायदा होईल याची खात्री नसते. परंतु भांडवलाबरोबरच स्वतःचे आयुष्य, करिअर वैयक्ती विकास वगैरे बाबीत धोका स्विकारावा लागतो.

नविन उद्योगात वैयक्तिक क्षमता व कौशल्याचा उपयोग किती होईल याची खात्री नसते. स्वतःच्या फायदा तोट्याचे मुल्यांकन न करता उद्योग निर्मितीकडे लक्ष देतो. भविष्याच्या अनिश्चिततेचा विचार न करता धाडस करणे गरजेचे असते. पुढे उद्योग विकासनंतर ही सरकारी धोरणे बदलणे, महामंदीचे निर्माण होणे, अतिरिक्त उत्पादन होणे, जागतिक युद्ध, साथीची रोगराई वगैरे सारख्या समस्या निर्माण झाल्यास न घाबरता त्याचा सामना करण्याचे धाडस करावे लागते. जे उद्योजक धोका पत्करण्याचे धाडस करतात तेच भविष्यात मोठे उद्योजक म्हणून उदयास येतात.

munotes.in

### ३) उत्पादन घटकांचे संघटन व व्यवस्थापन

प्रत्येक उद्योजकांना संघटक व संयोजकांच्या भूमिका साकार कराव्या लागतात. उत्पादन घटकांचे योग क्रमाने एकत्रित करून त्याला उत्पादनांची प्रक्रिया पूर्ण करावी लागते. म्हणून व्यवस्थापकांची पण विविध कार्य करावी लागतात. व्यवसायाचे स्वरूप निश्चितीपासून प्रत्यक्ष उत्पादतीत वस्तू किंवा सेवा बाजारपेठेत विक्री होईपर्यंतची सर्व कार्यांची जबाबदारी घ्यावी लागते. उद्योजक आपल्या व्यवसायासाठी योग्य ठरेल अशी संघटना निर्माण करून योग्य त्या प्रक्रियेसाठी मार्गदर्शन करून सुचना किंवा आदेश देत असतो. उद्योजकासमोर निर्माण होणार्या समस्या सोडवून उत्पादन कार्यप्रणाली सतत चालू राहिल याची काळजी घेतो. उद्योजकाला आर्थिक हिशोब आणि भांडवलासंबंधीची कार्य करावी लागतात. बाजारपेठेतील उद्योगाची प्रतिष्ठा निर्माण करून त्यात सातत्य राखण्याची भुमिका पार पाडावी लागत असते.

उद्योजकांना व्यवस्थापकीय कामाची भूमिका पार पाडत असताना आपले मुख्य उद्देश साध्य करण्यासाठी योग्य पद्धतीत उपाय राबवले जातात किंवा नाही याची पाहणी करत असतो. उद्योजक एक उत्तम व्यवस्थापक असावा तसाच तो सर्वोत्तम संघटक ही असणे गरजेचा असतो. संघटकांच्या नात्याने त्याचा सतत पर्यावरणाशी संपर्क साधून राहावे लागते. सामाजिक पर्यावरण, राजकीय पर्यावरण, राजकीय स्थिती आणि आर्थिक दर्जा यांचा बाबतीत उद्योजकांना सतर्क राहावे लागते. भांडवलांचे पर्यावरण हे सतत बदलत असते. या बदलत्या पर्यावरणामध्ये टिकण्यासाठी उद्योगातील काही प्रणालीत सुधारणा कराव्या लागतील. रोजच्या व्यवहारातील कामे उद्योजकांना कामे पण करावी लागतात तसेच व्यवसायातील सर्व कामाविषयी सुचना व आदेश द्याव्या लागतात. भविष्यकाळातील बाजारपेठेत आपल्या मालाला किती मागणी असू शकेल याला अंदाज करण्याचे काम त्याला करावे लागते. उद्योगासाठी लागणार्या आर्थिक मानवी मालाच्या साधनांचे समन्वय निर्माण करावे लागते. तसेच त्यांच्या कार्यप्रणालीत मार्गदर्शने करावे लागते. उद्योगधंद्याला प्रगतीपथावर घेऊन जाण्यासाठी लक्ष द्यावे लागते. कामावरील देखरेख आणि नियंत्रण यांतून त्याच्या कार्याची कल्पना येत यशस्वी होण्यासाठी उद्योजकाला व्यावसायिकांची व व्यवस्थापकांचे परिणामकारक कामे करावी लागतात.

### उद्योजकांची कार्ये

वरिल प्रमाणे भुमिका शिवाय उद्योजकाला महत्त्वाचे कार्ये करावी लागत असतात. ऑर्थर कोल यांनी उद्योजकांना महत्त्वाच्या पाच स्वरूपाची कार्ये करावी लागत असतात. त्यांच्या विचारानुसार उद्योजकांना कराव्या लागणार्या कार्याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

### १. उद्दिष्ट्ये निश्चिती

उद्योजकांना त्यांच्या व्यवस्थापकांची उद्दिष्ट्ये निश्चित करावी लागत असतात. उद्दिष्ट्ये निर्धारण हे आजच्या परिस्थितीशी तडजोड करणारी असावी लागतात. याशिवाय त्यामध्ये परिस्थितीप्रमाणे बदल करण्याची क्षमता असावी लागत असते.

### २. संघटन निर्मिती

उद्योजकांना विकसीत करणारे संघटन निर्माण करावे लागते. उद्योगातील सर्वोत्तम सहकार्यांचा समूह तयार करून त्यांच्याकडून संघटीत सहकार्य मिळवण्याची जबाबदारी उद्योजकांची असते.

### ३. तांत्रिक परिपूर्णता

आपल्या उद्योगाला तांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण करावे. बदलत्या मागणीप्रमाणे तांत्रिक बदल करून नवनवीन यंत्र तंत्राची मदत घेऊन उद्योगाला प्रगती पथावर घेऊन जाण्यासाठी नविन यंत्र तंत्र साधना करीत लागणारा अर्थपुरवठा करण्याचे ही कामे करावी लागते.

### ४. भांडवल उभारणी

कोणतीही कामे करतांना पुरेसे भांडवल म्हणजे आर्थिक गरज असते. जर असे भांडवल आपल्याकडे उपलब्ध नसेल तर भांडवलांची उभारणी करावी लागत असते. यासाठी शेअर्सची विक्री, कर्जरोख किंवा बँकाकडून कर्ज आणि सरकारी आर्थिक मदत वगैरे मार्ग पैकी योग्य मार्गाच्या मदतीनी उद्योगाच्या विविध कामासाठी पतपुरवठा करणे ही जबाबदारी पूर्ण करावी लागते. यासाठी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे अशा आर्थिक संस्थांशी उत्तम संबंध निर्माण करून त्यांच्याकडून आर्थिक गरज पूर्ण करण्याची कामे उद्योजकांना करावी लागत असतात.

### ५. ग्राहकांची आवड निवडीची माहीती -

बाजारपेठेत ग्राहक राजा असतो. तो त्याच्या आवड - निवड आणि परवडेल अशाच वस्तू खरेदी करत असतो. म्हणून ग्राहकांच्या योग्य पद्धतीने सेवा देऊ शकतील अशाच नवनवीन वस्तूचे उत्पादन करून बाजारात मांडावे लागते. म्हणजेच आपल्या उत्पादनांचे खरेदीदार ग्राहक वाढवण्याचा सतत प्रयत्न करावा लागतो. त्याशिवाय उत्तम स्वरूपाचा लोकसंपर्क निर्माण करणे पण उद्योजकांसाठी अतिशय महत्त्वाचे असते.

अशा विविध पद्धतीच्या भूमिका आणि कार्यात्मक योगदान उद्योजकांना करावे लागत असते.

## ३.४ उद्योजकांसमोरील आव्हाने

उद्योगक्षेत्रात विविध स्वरूपाचे नियोजनात्मक भूमिका व कार्ये पार पाडून बदलत्या परिस्थितीचा परिणाम म्हणून विविध स्वरूपाच्या आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी उद्योजकांची असते. कार्ल एच. व्हेस्पर यांनी उद्योगातील अडथळ्याच्या संदर्भा सविस्तर चर्चा केली आहे. त्याची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे आहे.

सामाजिक परिस्थितीत समाजामध्ये विविध स्वरूपाची मुल्य व मापदंड असतात. देशातील औद्योगिक स्तर सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असतो. याच सामाजिक घटकांकडून वस्तू व सेवांची मागणी वर उद्योग आधारीत असतो पण समाज हा परिवर्तनशील आहे. लोकसंख्या विचारधारा आवडी-निवडी फॅड फॅशन यामध्ये बदल होत असतात. अशा विविध स्थितीचा विचार करून आपल्या उत्पादनाची तयारी करावी लागते.

munotes.in

**उद्योजकांच्या समोरील अडथळ्यांचा तक्ता**

| परिस्थितीमुळे जमेची बाजू | अडथळा किंवा नुकसानीची बाजू |
|---|---|
| १) बाजारपेठेशी संबंध | १) अस्तित्वात देऊ शकणाऱ्या वस्तू सेवांची कमतरता |
| २) स्थानिक संस्था - कंपन्या | २) बाजारपेठेची ओळख नसते. |
| ३) सक्षम स्थानिक मनुष्य बळ | ३) तांत्रिक कौशल्यांची उणीव |
| ४) तांत्रिक शिक्षणाची मदत | ४) भांडवलाची कमतरता |
| ५) पुरवठादारांची मदत आणि पुरवठादारांकडून उदारी | ५) व्यवसायाबद्दल माहितीचा अभाव |
| ६) स्थानिक पत पुरवठा मदत | ६) इच्छा शक्तीचा अभाव |
| ७. बँकामार्फत पतपुरवठा सहकार्य | ७. सामाजिक समस्या |
| ८. स्थानिक स्तरावर योग्य सल्लागार | ८. नोकरी म्हणजे पैशाची सहायता |
| ९. योग्य उद्योजकीय प्रशिक्षण | ९. ताणतणाव व थकवा याकडे विशेष लक्ष देणे. |
| १०. यशस्वी आदर्श | १०. कायदेशीर अडचणी व लाल फिती कारभार |
| ११. निकोप स्पर्धा | ११. पेटंटविषयी शंका |

### अ) सामाजिक आव्हाने

समाज आणि उद्योजक यांचे जवळचे आणि कायमचे संबंधी असतात. समाजात विविध प्रकारचे गट असतात. पण कुटुंब हा व्यापक असतात. कारण तो उपभोक्ता गट आहे. वस्तू व सेवांची कायम मागणी कुटुंबाकडून होत असते. कुटुंबाच्या मागणीचा पुरवठा करण्याची जबाबदारी असते. अशा पुरवटा संबंधामुळे विविध स्वरूपाची आव्हाने निर्माण होतात. यापैकी काही महत्त्वाची आव्हाने पुढील आहेत.

### १. सुरक्षा

समाजात विविध कारणामुळे आंदोलने, संप मोर्चे व बंद करून अशांतता निर्माण केले जाते. अशा वेळी उद्योजकांना सहकार्य करावे लागते. अन्यथा समाजाचा रोष पत्करावा लागत असतो. यामुळे उद्योगाचा मालमत्ता व मनुष्यबळाची हानी होऊ शकते अशा वेळी मिळालेली मागणी योग्य वेळी पूर्ण करण्याचे मोठे आव्हान असते. याचा दुष्परिणाम उद्योगावर होण्याची शक्यता असते.



munotes.in

## २. प्रशासकीय दिरंगाई

देशातील विविध कार्यालये पण समाजाचे घटक आहेत. अशा कार्यालयीन कार्यपद्धती एक आव्हाने असतात. यास लाल फितीचा कारभार म्हणून ओळखतात. केवळ फाईली टेबलावरच पडून राहतात. यामुळे उद्योजकांना व्यावसायिक निर्णय घेणे आव्हानात्मक होते. याशिवाय सहारी कार्यक्रमातील भ्रष्टाचार हा शिष्टाचार होऊन बसल्यामुळे उद्योजकांना अर्थ भुर्दंड पण सोसावा लागतो.

## ३. सहकार्य अभाव

समाजातील सर्व घटकांकडून व्यावसायिकास सहकार्याची अपेक्षा असतात. व्यक्तिगत ग्राहक वर्ग आणि शासकीय कचेर्यात यांना जेव्हा उधारीवर माल विकला जातो. तेव्हा त्यांना वस्तूचे पैसे वेळेवर देण्याचे सहकार्यांच्या अपेक्षा असतात. पण ग्राहकांना सरकारी कार्यालयात सहकार्यांची वसुलीची मोठी समस्या असते. यामुळे उद्योगाच्या आर्थिक समस्या निर्माण होतात. सामाजिक सहकार्य मिळवणे ही उद्योगाच्या व्यावसायिकदृष्ट्या खूप मोठी समस्या असते.

## ४. जनसंपर्काचा अभाव

व्यवसायाची बाजारपेठेतील प्रसिद्धी शिवाय विकास होणे अशक्य असते. तसेच जुन्या ग्राहकवर्गाला कायम ठेवण्यासाठी बाजारातील इतर उत्पादनाप्रमाणे आपली ही जाहिरात गरजेचे असते. या शिवाय प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मार्गाने संपर्क वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत असतो. ग्राहकांच्या मागणी प्रमाणे त्यांच्या अपेक्षा पूर्ण करणे उद्योजकांच्या समोर खूप मोठे आव्हान असते.

## ५. श्रमशक्तीचे पाठबळ

समाजात असंख्य स्वरूपाचे कामगार शक्ती मोठ्या प्रमाणात आहे. पण प्रामाणिक, गुणी, कर्तव्यदक्ष व उद्योगाशी एकनिष्ठ कर्मचार्यांचा पुरवठा मिळवणे मोठे आव्हान असते. कारण श्रमशक्ती शिवाय एकटा उद्योजक उत्पादन करु शकत नाही. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे कुशल कामगारांचा अभाव असल्यामुळे उद्योजकांना खूप मोठे प्रयत्न करून चांगले कामगार मिळवावे लागतात.

## ब) जागतिकीकरण व उदारीकरणाचे आव्हान

आधुनिक काळात जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण या नविन संकल्पना उद्योग क्षेत्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. जगातील उद्योग व अर्थव्यवस्थेला मुक्त बाजाराची संकल्पना जगातील स्तरावर निर्माण झाली आहे. जागतिक व्यापारी संघटना 'गट करारा' नुसार नविन धोरणे पुढे आली आहे. व्यापाराला पारदर्शक मुक्त व्यापार व गुंतवणूक बहुराष्ट्रीय कंपन्यांची निर्मिती सरकारी उद्योगाची निर गुंतवणूकीकरण व विदेशी भांडवल गुंतवणुकीला निर्बंधाना शिथिलता असते ही नवीन प्रमाणे आहे. थोडक्यात

munotes.in

देशातील उद्योगाबरोबरच विदेश कंपन्या आणि खाजगी उद्योजकांशी स्पर्धेचे मोठे आव्हान आहे. अशा या व्यवस्थेमुळे निर्माण होणार्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) विकसनशील देशातील बाजारपेठेत विदेशी उत्पादने आणि सेवा आल्यामुळे स्पर्धा तीव्र बनली आहे. उदा. चीनच्या स्वस्त वस्तूने भारतीय बाजारपेठेत रेलचेल केली आहे.

२) आज जगात अमेरीका ही महासत्ता आहे. यामुळे जगातील विविध देशांवर त्यांचा प्रभाव

३) आहे. व्यापाराबरोबरच देशातील आर्थिक धोरणावर महासत्तेचा प्रभाव दिसून येतो.

४) जागतिक मंदीच्या लाटेच्या समस्या उघुउद्योगांना अधिक प्रभावित करणार्या आहेत. जगात उपभोग प्रवृत्ती निर्माण झाल्याने व कर्जे स्वस्त झाल्यामुळे वस्तूची मागणी वाढते. चलन वाढीला वेग येतो. जीवनावश्यक वस्तू व चैनीच्या वस्तूच्या किंमती झपाट्याने वाढतात. परदेशातील वस्तू निर्यातीमधून अधिक आर्थिक कमाई करण्याच्या प्रवृत्तीने खाजगीकरणाने पुन्हा भर घातली आहे.

५) देशातील उत्पादकांपुढे स्पर्धेत टिकण्यासाठी उत्पादन खर्च कमी करण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.

६) जागतिक अर्थ व्यवस्थेचे उदारीकरण झाल्यामुळे नविन समस्या निर्माण झाल्या आहेत. जगातील मंदीच्या लाटेने अमेरिका, इंग्लंड यांच्यासह त्यांच्यावर आधारीत असणाऱ्या राष्ट्रांची आर्थिक परिस्थिती कोलमडली आहे. भारतासारख्या विकसनशील देशात माहिती तंत्रज्ञानाचे उद्योगांत कामगार कपातीचे धोरण राबवले गेले होते. जर रोजगार कपातीचा प्रश्न निर्माण होणार असेल तर असे धोरण नको म्हणण्याची वेळ आली आहे. कांही काळाआधी भांडवली बाजारातही निर्देशांक घसरण हा चिंतेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

### क) सांस्कृतिक विविधतेची आव्हाने

उद्योजकांना योग्य धोरण निर्माण करून व्यावसायिक आराखडा तयार करतांना विविध सांस्कृतिक परिस्थितीच्या व्यक्तीच्या मागण्याचा विचार करून आंतरराष्ट्रीय उद्योजक निर्माण होतात. याकरिता परंपरा तंत्रज्ञान, आर्थिक, राजकीय भाषा वगैरे सांस्कृतिक फरक लक्षात घेऊन आपले उत्पादन निर्माण करावे लागते. देशातील छोट्या उद्योगांनाही स्थानिक सांस्कृतिक भेदांना लक्षात घेणे आवश्यक असते.

### १. सांस्कृतिक भेद

ग्राहकांच्या आवडी-निवडी संस्कृतीवर आधारीत असतात. विदेशी व्यावसायिक धोरण ठरवतांना त्या देशातील समाजाची सांस्कृतिक वैशिष्ट्ये माहिती करून घेणे आवश्यक असते. उदा. भारतात दिवाळीला फटाके फोडणे, मकर संक्रांतीला पतंग तर गाईच्या

मांस विक्रीवर बंदी आहे. यांचा विचार करूनच उत्पादन निर्माण करून विक्री करणे आवश्यक आहे.

### २. भाषा

उद्योगात विविध भाषिक कामगार असतात. त्यांच्याशी संवाद साधणे एक समस्या असते. विदेशी व्यवसाय करताना इंग्रजी भाषेचा वापर करावा तसेच जाहिराती करतांना विविध देशातील स्थानिक भाषांचा वापर करावा याचा विचार काळजीपूर्वक करावा लागतो. भारतासारख्या देशात विविध लोक विविध भाषा बोलणारे असतील तर छोट्या किंवा स्थानिक उद्योजकांना पण स्थानिक भाषा विविधतेच्या समस्या निर्माण होत असतात.

### ३. तंत्रज्ञान

उद्योजकांने उत्पादन आणि विक्री यातील संधीचा विचार तंत्रज्ञान विकास आणि सुविधा यातील फरक लक्षात घेऊन करायला हवा. जे तंत्रज्ञान उपलब्ध नाही तेथे त्याच्या वस्तूची विक्री करू शकत नाही. उदा. पाचव्या जनरेशनचे (5G) नेटवर्क उपलब्ध नसतात. पाचव्या जनरेशनचे मोबाईल विक्री करणे चुकीचे असते. समाजातील लोकांना प्राथमिक माहितीसाठी नेट हवे आहे. पण तुम्ही इंटरनेटवर तुमच्या उत्पादनाच्या विविध जाहिराती करून फायदा होणार नाही. उदा. शेतकर्यांसाठी इंटरनेटवर खते, बी-बियाणांच्या जाहीराती करणे.

### ४. व्यावसायिक दृष्टिकोन

विदेशी बाजारात व्यवसाय करतांना त्या त्या देशातील लोकांच्या आवडी-निवडी त्यांचा दृष्टिकोन आणि वर्तन पद्धती यांची माहिती उद्योजकांना असणे महत्त्वाचे असते. व्यवसायाच्या दृष्टीने तेथील वातावरण अनुकूल आहे की नाही याचा उद्योगावर काय परिणाम होऊ शकेल याचे अनुमान उद्योजकांना घेता यावे. विदेशी कंपन्यांशी स्थानिक बाजारात स्पर्धा करतांना छोट्या उद्योजकांना पण अशी माहिती महत्त्वाची असते.

## ड) भारतीय उद्योजकांसमोरील आव्हाने

भारत हा विकसनशील देश आहे. यामुळे विकसित देशातील उद्योजक आणि इतर उद्योजकांच्या बरोबर व्यावसायिक स्पर्धा करणे आवश्यक आहे पण त्यापुर्वी भारतीय स्थानिक समस्यांचे आव्हान आहे.

### १. शिक्षण

उद्योग क्षेत्राचा विकास करण्यासाठी योग्य तांत्रिक शिक्षण मिळणे गरजेचे असते. याबरोबर विशिष्ट व्यवसायाचे प्रशिक्षण घेणे गरजेचे असते. असे प्रशिक्षण योग्य दरात मिळणे गरजेचे असते. शिवाय शिक्षण - प्रशिक्षण हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे असणे गरजेचे असते. ग्रामिण क्षेत्रात मुलभूत शिक्षणांच्याच समस्या आहेत तर औद्योगिक प्रशिक्षण मिळणे कठिण बाब आहे. या सर्व परिस्थितीवर मात करून जगातील उद्योजकांना सामना करणे मोठे आव्हान आहे.

### २. शासकीय मान्यता

भारतात कोणताही नियम सुरु करण्यापुर्वी त्या संबंधीच्या विविध परवानग्या आणि प्रमाणपत्र मिळविणे आवश्यक असते. त्यासाठी विहित नमुन्याचा अर्ज सरकारी कार्यालयांना करावा लागतो. यासाठी सरकारच्या संबंधीत विविध खात्यांचे सहकार्य निर्माण करावे लागते. अशा परिस्थितीत उद्योग वेळेवर सुरु होईलच याची खात्री नसते. शिवाय सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचार एक समस्या आहे. कांही तरुणांना तर इच्छा असुनही परवानगी मिळत नाही म्हणून उद्योग सुरू करणे शक्य होत नाही.

### ३. मुलभूत साधनांच्या समस्या

केवळ उद्योग सुरु करण्याची इच्छा असून चालत नाही तर उद्योगासाठी लागणार्या पायाभूत सुविधा पण योग्य प्रमाणात उपलब्ध असणे गरजेचे असते. औद्योगिक वसाहतीत (MIDC) मध्ये माफक दराने जागा उपलब्ध असणे पाणी, वीज, वाहतूक कामगार पुरवठा, कच्चा मालाची उपलब्धता, योग्य प्रमाणात उपलब्ध हव्यात. शिवाय इंधन, दूरध्वनी वगैरे सेवा माफक दरात हव्यात पण भारतीय महागाईचा विचार केल्यास हा प्रश्न खूप कठिण आहे.

### ४. भांडवल पुरवठा

उद्योगाच्या स्थापनेपासून ते उद्योग भरभराटीपर्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे भांडवल उपलब्धता होय. भारतीय वित्तीय संस्थांकडून भांडवल मिळविण्याच्या विविध प्रक्रिया पद्धतीमुळे अनेक अडचणी निर्माण होतात. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना अनेक योजना केवळ कागदावर आहेत. प्रत्येक नव उद्योजकांना तर त्याचा फायदा होत नाही. सुलभ पद्धतीने वित्तीय पुरवठा होऊन नवीन उद्योग सुरू होऊन विकसीत होतील अशा योजना नसल्यामुळे अनेक उद्योग बंद होताना दिसतात.

### ५. उद्योग संरक्षण धोरण

लघु उद्योग व मध्यम उद्योगधंद्यांना अस्तित्त्व टिकविण्यासाठी सक्षम होईपर्यंत शासनाने संरक्षणात्मक धोरणात्मक कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. सर्व उद्योगाच्या निकोप विकासाची काळजी घेतली पाहिजे. देशात उद्योजकांचा विकास ही काळाची आवश्यकता आहे. वाढती लोकसंख्या असणार्या चीन, भारतासारख्या देशात रोजगार संधीमध्ये वाढीची गटनी खूपच मंद असते. अशा रोजगाराचे समाजातील सर्व स्तरात समान होत नाही. म्हणून नव्या पिढीला साक्षर-निरक्षर तरुणांना स्वतःच्या पायावर उभे करणे गरजेचे असते. उद्योजक विकासाला पर्याय नसतो. त्यासाठी शासनाने निर्माण होणार्या समस्या सोडविण्याची तयारी सतत ठेवणे गरजेचे असते. म्हणजे उद्योजकांची वाट सोपी केली पाहिजे. जर उद्योजकांना संरक्षण मिळाले तर भारत लवकरच आर्थिक महासत्ता म्हणून नाव रूपाला आलेली दिसेल.

munotes.in

उद्योजक हा उद्योगक्षेत्रातील सर्व बाबींना जबाबदार असतो. तसेच समाजातील सर्व घटकांचा समन्वय साधून उद्योगाच्या विकासाबरोबर राष्ट्रीय प्रगती व सामाजिक परिवर्तनाची जबाबदारी पण पूर्ण करावी लागत असते. असा उद्योजक हा सर्वगुणसंपन्न असणे गरजेचे आहे. उद्योजकांच्या अंगी कोणते गुण कौशल्य असावेत याची माहिती पाहू.

## ३.५ उद्योजकांची गुण कौशल्य

उद्योगाची निर्मिती करण्यासाठी जमिन, भांडवल, पाणी व्यवस्थापक व कामगार या घटकांची नितांत गरज असते पण या सर्व साधनाची उपलब्ध करून समन्वय साधुन प्रत्यक्ष उत्पादन करून घेणारी सर्वात महत्त्वाची व्यक्ती म्हणजे उद्योजक होय. असा हा महत्त्वाचा सर्वगुणसंपन्न असणे आवश्यक असते. जर औद्योगिक क्षेत्रात एक प्रभावी उद्योगपती म्हणून नावलौकिक मिळवण्यासाठी आवश्यक असणार्या गुण व कौशल्यांची ओळख महत्त्वाची आहे.

### अ) उद्योजकांचे आवश्यक गुण

### १) ज्ञानसंपन्नता

उद्योजकाला उद्योग क्षेत्राबरोबरच जगातील विविध क्षेत्राचे ज्ञान असणे आवश्यक असते. म्हणून उद्योजक हा उच्च-पदवीधर असावा म्हणजे त्याच्याकडे जगातील विविध परिस्थितीबरोबर समन्वय साधण्यासाठी परिपूर्ण ज्ञान असू शकेल. थोडक्यात उद्योजक एक ज्ञानी व्यक्ती असावी.

### २) बाजारपेठेचे आकलन

उद्योजकाला उद्योगातून जे उत्पादन करावयाचे असते त्याला बाजारात चांगली मागणी असणे गरजेचे असते. म्हणून बाजारातील मागणी पुरवठा, तेजीमंदी आणि इतर चढ-उतारासंबंधीचे आकलन असणारी व्यक्तीच ग्राहकांच्या गरजा पूर्ण करून अधिक नफा कमवून यशस्वी होऊन प्रभावी उद्योगपती म्हणून उदयास येत असते म्हणून बाजारातील प्रत्येक हालचालीचे संपूर्ण माहिती असणे गरजेचे असते.

### ३) विकसीत व्यक्तीमत्त्व

उद्योजक हा प्रथम एक 'मानव' असतो यामुळे मानवी समाजाच्या निती-नियमाप्रमाणे विविध भूमिका त्यास पार पाडाव्या लागत असतात. अशा भूमिका साकारतांना व्यक्तींचा स्वभाव, गुणधर्म, आचार-विचार यांचा परिणाम हा व्यक्तीच्या वर्तनावर होत असतो. म्हणून उद्योजकांच्या सद्गुणी व्यक्तीमत्त्वाचा विकास करून सामाजिक संबंध सुधारण्याची गरज असते. म्हणजे उद्योगात संघर्षजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा उपयोग होत असतो.

### ४) व्यवस्थापकीय प्रशिक्षण

उद्योजक हा उद्योगाचा मालक असला तरीही आपला उद्योगा सुनियोजित चालवण्यासाठी विशिष्ट पद्धतीच्या व्यवस्थापकीय शिक्षण - प्रशिक्षणाची नितांत गरज असते. कारण उद्योगासंबंधीचा कोणताही निर्णय घेतांना सारासार विचार करून नियोजनबद्ध निर्णय घेऊन वेळ व पैशाची बचत होत असलते. प्रत्येक बाब इतरांच्या सल्ल्यावर आधारीत न राहता काही ठोस निर्णयासाठी अशा प्रशिक्षणाची गरज असते.

### ५. आर्थिक ज्ञान

उद्योगक्षेत्रातील प्रत्येक व्यवहार हा आथिर्ाक देवाण-घेवाणी शिवाय करणे शक्य नसते. नफा-तोटा, खरेदी-विक्री, मागणी पुरवठा, कर्जरोखे, शेअर बाजार, बँकांचे व्यवहार, प्रतधोरण, आर्थिक पतपुरवठा करणार्या विविध संख्या, सरकारचे आर्थिक नियम-कायदे-धोरण या संबंधी सर्व प्रकारे माहिती व आकलन उद्योजकाला असणे गरजेचे आहे. कारण आर्थिक उलाढाल ही उद्योगाचा महत्त्वाचा विभाग असतो.

### ब) उद्योजकांची कौशल्य

### १. संघटन कौशल्य

उद्योजकांना आपल्या उद्योग संघटनेचा प्रभावी संघटकांची भूमिका साकार करावी लागते. उद्योगात श्रम करणारे कामगार, व्यवस्थापक, बाजारपेठ, ग्राहक, पतसंस्था यांत उत्तम प्रकारे समन्वय निर्माण करण्यासाठी कौशल्यपुर्ण संघटक होणे गरजेचे असते. एक कणखर नेतृत्त्वाप्रमाणे औद्योगिक संघटन चालवण्याची क्षमता उद्योजकांच्या अंगी असणे गरजेचे आहे.

### २. व्यवस्थापन कौशल्य

उद्योग एक मोठी व्यवस्था असते. विविध विभाग व शाखांचा समावेश असतो. अशा विविध घटकांना सुनियोजित करण्यासाठी व्यवस्थापकीय कौशल्य महत्त्वाचे असते. म्हणून उद्योजकांनी व्यवस्थापकीय कौशल्य संपन्नतेसाठी उत्तम प्रकारे प्रशिक्षण घेणे गरजेचे असते.

### ३. समस्या निर्मुलन कौशल्य

उद्योगात अनेक घटकांचा सहभाग असतो यामुळे चांगल्या बाबी बरोबर कांही समस्या पण निर्माण होत असतात. यामुळे उत्पादन प्रक्रियेवर वाईट परिणाम होण्याची शक्यता असते. म्हणून उद्योजकांच्या अंगी अशा समस्या सोडविण्याची पात्रता असणे गरजेचे असते. तांत्रिक बिघाड, संघर्ष, आर्थिक मंदी, अतिरिक्त उत्पादन, महागाई नैसर्गिक आपत्ती, जुनी उत्पादन प्रणाली यासारख्या समस्या सोडविण्याचे कौशल्य अवगत असणे गरजेचे असते.

munotes.in

### ४. मानवी संबंध संवर्धन कौशल्य

उद्योग संघटनेत मानवी हक्क व यंत्रिक घटक यांच्या मदतीने उत्पादन केले जाते. यंत्र हा निर्जीव घटक असतो तर कामगार हा जिवंत मानवी प्राणी असतो. निसर्ग नियमानुसार त्यास तहान, भूक, आळस, थकवा, प्रेम यासारख्या सहज प्रकृती असतात. हे ओळखून औद्योगिक क्षेत्राचा विकासात मानवी संबंध विकसीत करण्यासाठी विविध कार्यक्रम राबविणे गरजेचे असते. ज्यामुळे मानवी हित संबंधाची जतन करण्याचे कौशल्य आत्मसात असावे.

### ५. तांत्रिक कौशल्य

आधुनिक काळात उद्योगाच्या सर्वांगीण विकासासाठी बदलत्या परिस्थिती प्रमाणे नवीन यंत्रतंत्राचा उपयोग करणे गरजेचे आहे. परंतु अशा नवीन प्रणाली बद्दल उद्योजकाकडे कौशल्य असणे गरजेचे आहे. संगणकीय हिशोबांची टॅली पद्धती इ-मेल, फॅक्स, इंटरनेट या शिवाय धोक्याच्या ठिकाणी स्वयंचलित यंत्र आणि यंत्रमानव (रोबो) यांच्या विषयीचे कौशल्य असणे गरजेचे आहे.

### ६. नेतृत्त्व कौशल्य

उद्योजक हा आपल्या व्यवसायाचा नेता असतो. कारण त्यानेच निर्माण केलेली ती व्यवस्था असते. यासाठी योग्य-अयोग्य या संबंधीची जाणिव केवळ अधिक क्षमतेने उद्योजकालाच असते. म्हणून तो एका प्रभावी नेतृत्त्वाप्रमाणे संकटसमयी आपली संघटना सक्षमपणे पुढे घेऊन जाऊ शकतो. म्हणून संघटना चांगल्या पद्धतीने प्रगती करू शकते यासाठी उद्योजकांनी संकटाची जबाबदारी आणि प्रगतीचा आनंद घेऊन चालणारा नेता असावा.

अशा पद्धतीने उद्योजक हा उद्योगासाठी अतिशय महत्त्वाची व्यक्ती असते.

## ३.६ सारांश

औद्योगिक समाजशास्त्र किंवा श्रमाचे समाजशास्त्र या दृष्टिकोनातून उद्योजक ही संकल्पना अतिशय महत्त्वाची आहे. औद्योगिक क्रांती नंतर जगातील व्यावसायिक स्वरूपात मोठा बदल झाला. कारागीरी पद्धती र्हास पाहून कारखानदारी उद्योग विकसीत झाली. परंतु यामध्ये केवळ विशिष्ट घटकातील उद्योजक निर्माण होणे समाजाच्या दृष्टिने हिताचे नाही. म्हणून समाजातील कोणत्याही व्यक्तीला एक उत्तम उद्योजक होण्याच्या दृष्टिने हा पाठ अतिशय महत्त्वाचा आहे. भारतीय समाजाच्या दृष्टिने स्त्री वर्गाला वर्षानुवर्षे पुरूषांची दासी म्हणून गुलामीचे जीवन जगायला लागत होते. म्हणून स्त्री समाजालाही आर्थिक स्वावलंबन होण्यासाठी विविध क्षेत्रात संधी आहेत यास उद्योग क्षेत्र पण अपवाद नाही. जगात अनेक देशात स्त्री उद्योजक नावारूपाला आल्या आहेत. तशा भारतात पण काही बोटावर मोजण्याइतक्या स्त्री उद्योजक आहेत. परंतु या पेक्षाही अनेक स्त्रियांनी या क्षेत्रात आपला ठसा उमटवणे गरजेचे आहे म्हणून हा पाठ अतिशय महत्त्वाचा आहे.

munotes.in

समाजातील कोणत्याही व्यक्तीला उद्योजक होण्यासाठी ज्या पद्धती शिक्षण प्रशिक्षण व संसाधनाची गरज आहे. याबद्दल सविस्तर चर्चा केलेली आहे. ज्यामुळे कोणतीही व्यक्ती जर उद्योजक होऊ इच्छित असेल तर तिला विविध गुण कौशल्याचे ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे.

उद्योग क्षेत्राचा विकास म्हणजे देशाचा आणि पर्यायाने समाजाचा विकास असतो. म्हणून देशातील बहुसंख्य व्यक्ती जर उद्योग प्रक्रियेत सहभागी असतील तर त्या देशातील आर्थिक स्थिती सुधारत असते. म्हणून वैयक्तिक विकासा बरोबर सामाजिक विकासासाठी जास्तीत जास्त विकास प्रगती पथावर जाणे गरजेचे असते पण उद्योगाला विकसीत करण्यासाठी सर्वगुणसंपन्न उद्योजक उदयाला येणे महत्त्वाचे असते.

## ३.७ अभ्यासाचे प्रश्न

१) उद्योजकाचा अर्थ व संकल्पना स्पष्ट करून उद्योग व उद्योजक यातील फरक सांगा.

२) उद्योजकांच्या महत्त्वाच्या कार्यासंबंधीच्या विविध भूमिका स्पष्ट करा.

३) उद्योजकांच्या समोरील आव्हाने सांगून त्यांच्या गुण-कौशल्यांचा सविस्तर आढावा घ्या.

४) एखाद्या तरूणाला उद्योजक बनण्यासाठी आवश्यक त्या माहितीवर निबंध लिहा.

**टिपा लिहा**

१) उद्योजकाची संकल्पना

२) उद्योजकाची भूमिका

३) उद्योजकाची कौशल्ये

## ३.८ संदर्भ ग्रंथ

१) डॉ. सुधा काळदाते औद्योगिक समाजशास्त्र

२) प्रा. सुहास निर्गुण श्रम आणि व्यावसायाचे समाजशास्त्र

३) सर्जेराव बोराडे, डॉ. प्रदीप गांगुर्डे, शिल्पा जाधव, समाजशास्त्रातील उदयोन्मुख क्षेत्रे, निराली प्रकाशन, पुणे - २०१८.

❖❖❖❖

# ४

## महिला उद्योजिका

**घटक रचना**


४.० उद्दीष्टे

४.१ परिचय

४.२ उद्योजकतेची वाढती गरज

४.३ महिला उद्योजक

४.४ भारतातील महिला उद्योजक

४.५ महिला उद्योजकता आव्हाने

४.६ महिला उद्योजकांचे योगदान

४.७ आव्हानांवर मात करण्यासाठी सूचना

४.८ निष्कर्ष

४.९ सारांश

४.१० प्रश्न

४.११ संदर्भ


## ४.० उद्दीष्टे

- उद्योजकतेत महिलांची भूमिका समजून घेणे
- उद्योजकतेमध्ये महिलांनी घेतलेली आव्हाने जाणून घेणे
- असे बदल सुचविणे ज्यामुळे महिलांना आव्हानांवर मात करण्यास मदत होईल

## ४.१ परिचय

पुरातन काळापासून उद्योजकत्व नेहमीच पुरुषप्रधान क्षेत्रात राहिले असे म्हणण्याची गरज नाही तथापि, परिस्थितीत महिलांना नाविन्यपूर्ण आणि प्रेरणादायी उद्योजक बनविण्यामध्ये बदल झाले आहेत. महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याचा आग्रह धरला

शिक्षणाच्या प्रसारामुळे महिलांना उद्योजकतेत प्रवेश मिळाला. पूर्वी लोक त्यांच्या घराच्या बाहेर काम करणाऱ्या स्त्रियांकडे विचित्रपणे पाहत असत. पण आज परिस्थिती बदलली आहे आणि जवळपास प्रत्येक प्रकारच्या उद्योगात महिला उद्योजक आपल्याला दिसतात. आर्थिक विकासात महिलांच्या भूमिकेकडे कोणी दुर्लक्ष करू शकत नाही, तर त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. तरीही महिला उद्योजकतेच्या विकासामध्ये खूप वाव आहे. महिला कौशल्य

munotes.in

आणि वैशिष्ट्ये आत्मसात करण्यासाठी महिला उद्योजकांना योग्य प्रशिक्षण दिले पाहिजे जेणेकरुन बदलत्या जागतिक परिस्थितीतील आव्हानांना सामोरे जावे लागेल.

## ४.२ उद्योजकतेची वाढती गरज

महिला उद्योजकता ही अलीकडील घटना आहे जी १९७० मध्ये अस्तित्त्वात आली. परंतु नवीन औद्योगिक धोरण अस्तित्त्वात आल्यानंतर ही संकल्पना १९९१ मध्ये प्रख्यात झाली. या धोरणामुळे जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाला प्रोत्साहन मिळाले ज्यामुळे पुरुष आणि स्त्रियांसाठी जास्तीत जास्त स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. सरकारने देऊ केलेल्या योजना व प्रोत्साहन महिला उद्योजकांच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात, या यादीची यादी भारतात फार लांब आहे. या महिलांनी उद्योजकतेत प्रवेश केलेली कारणे भिन्न असू शकतात. काहींनी आपल्या कुटुंबाचे समर्थन करण्यासाठी किंवा कौटुंबिक व्यवसाय विकसित करण्यासाठी किंवा आर्थिक स्वतंत्रपणे प्रवेश केला असेल. समस्या काहीही असो, महिला उद्योजक कार्यक्षम जोखिम असणारी नवनिर्माते आणि आयोजक म्हणून ओळखल्या जातात. वेगवान गतीमान जागतिक परिस्थितीने आपल्या अर्थव्यवस्थेत मोठे बदल घडवून आणले आहेत. वातावरणातील स्पर्धा रोजगाराच्या संधींना मर्यादित करते त्यामुळे स्वयंरोजगाराची गरज निर्माण होते. स्वयंरोजगार आणि उद्योजकता विकासाच्या संधी कोणत्याही लिंगभेदाशिवाय पुरुष आणि महिला दोघांनाही द्याव्या लागतील. अशा प्रकारे बेरोजगारीच्या समस्यांशी लढण्यासाठी उद्योजकता विकास हे एक शक्तिशाली साधन असेल. उद्योजकता हे देशाच्या विकासास हातभार लावणारे प्रमुख घटक आहे. लोकांचा उद्योजक आत्मा आर्थिक उन्नती करतो विकास.

## ४.३ महिला उद्योजक

एक महिला उद्योजक ही एक महिला किंवा महिलांचा एक गट आहे जो आरंभ, आयोजन आणि ऑपरेट करतो वैयक्तिक फायद्यासाठी व्यवसाय उपक्रम. महिला उद्योजक संकल्पना संबंधित आहे महिला सबलीकरण आणि मुक्ती यासारख्या संकल्पना महिला सापडतात पूर्वीच्या दिवसांच्या तुलनेत वेगवेगळ्या क्षेत्रे जेथे महिलांचे क्रियाकलाप होते फक्त घरगुती कामापुरती मर्यादित नाहीत. आज आपल्याला केवळ पापड, लोणचे आणि पावडर व्यवसायातच नव्हे तर उत्पादन, व्यापार आणि सेवा क्षेत्रातही महिला आढळतात. यात वेग नक्कीच कमी आहे यात शंका नाही, परंतु महिला उद्योजक क्षेत्रात प्रवेश करीत आहेत आणि निश्चितच ते त्यांचा प्रभाव निर्माण करीत आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१. उद्योजकता आर्थिक वाढीस कशी मदत करते?

२. आपण महिला उद्योजकांचा अर्थ स्पष्ट करू शकाल का?

munotes.in

## ४.४ भारतातील महिला उद्योजक

७० आणि ९० च्या दशकात स्त्रिया विविध संधींकडे आकर्षित झाल्या अध्यापन नोकरी, बँकिंग क्षेत्र. रोजगारमध्ये अशा स्त्रिया देखील होत्या ज्या कृषीसारख्या कमी उत्पादक कार्यात सापडल्या. ते गृहपाठकार म्हणून समजले गेले आणि स्त्री उद्योजकीय क्रियाकलाप घेऊ शकते ही कल्पना एक विनोद मानली गेली. नवीन औद्योगिक धोरण सुरू झाल्यानंतर महिलांनी बदलांना प्रतिसाद देणे सुरू केले आणि उद्योजकांच्या बाजारात प्रवेश करण्यास सुरवात केली. महिलांनी पापड, लोणची इत्यादींनी घरगुती उत्पादनांपासून सुरुवात केली परंतु नंतर उत्पादन, व्यापार आणि सेवा संबंधित क्षेत्राशी संबंधित मध्यम उद्योगांच्या उद्योजक कार्याकडे लक्ष केंद्रित केले गेले. नियोजन आयोगाने आणि भारत सरकारनेही त्यांची गरज ओळखली महिलांनी आर्थिक विकासाच्या मुख्य प्रवाहात भाग घ्यावा. भारत सरकार विविध धोरण आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून भारतीय महिलांना पुढे येण्यास प्रोत्साहित करीत आहे. उदाहरणार्थ. रूरल यूथ फॉर सेल्फ एम्प्लॉयमेंट (टीआरवायएसईएम), पंतप्रधान रोजगार योजना (पीएमआरवाय), ग्रामीण भागात महिला आणि मुलांचा विकास (डीडब्ल्यूआरसीए), एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (आयआरडीपी). महिला उद्योजकांना अनुदान, कर माफी योजना आणि सवलती देखील सरकारने वाढविल्या आहेत. शासनाने देऊ केलेल्या काही योजना खालीलप्रमाणे.

१. राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ (एनएसआयसी) द्वारे पुरवलेली एकात्मिक समर्थन योजना

२. पंतप्रधानांचा रोजगार निर्मिती कार्यक्रम (केव्हीआयसी) आणि कॉयर बोर्ड

३. बँक ऑफ इंडिया द्वारे प्रियदर्शिनी योजना

४. स्त्रियांसाठी व्यापार संबंधित उद्योजकता सहाय्य आणि विकास (TREAD) योजना, जी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाने पुरविली आहे.

५. मायक्रो व स्मॉल एंटरप्राइजेज क्लस्टर डेव्हलपमेंट प्रोग्राम (एमएसई - सीडीपी)

६. महिलांसाठी प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमांना सहाय्य (एसटीईपी)

७. बिगर शेती विकास (एआरडब्ल्यूएनडी) योजनांमध्ये ग्रामीण महिलांना सहाय्य

८ . महिला व बालविकास मंत्रालयाच्या योजनांनुसार स्वयंसिद्ध सिद्ध

९ . क्रेडिट गॅरंटी फंड योजना

१०. महिलांसाठी सिडबी विपणन निधी

११. व्यवस्थापन विकास कार्यक्रम

१२. महिला समिती योजना

१३. इंदिरा महिला योजना

१४. कृषी व ग्रामीण विकास योजनांसाठी राष्ट्रीय बँका

munotes.in

१५. एसबीआयची स्त्री शक्ती योजना

१६. स्वयंसेवी संस्था क्रेडिट योजना

१७. मायक्रो क्रेडिट योजना

१८. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (आयआरडीपी)

१९. महिला विकास महामंडळ (डब्ल्यूडीसी)

२०. ग्रामीण महिलांच्या शेती नसलेल्या उत्पादनांचे विपणन (माहिमा)

भारत सरकार, बँका, स्वयंसेवी संस्था आणि इतर विविध संघटनांच्या प्रयत्नांनी महिलांना स्वतःचे उद्योग सुरू करण्यास प्रोत्साहित केले. महिलांनी या क्षेत्रात प्रदीर्घ प्रवास केला असला तरी, भविष्य कठीण आणि अत्यंत आवश्यक आहे.

## ४.५ महिला उद्योजकता आव्हाने

ज्याप्रमाणे एखाद्या स्त्रीला तिच्या दैनंदिन जीवनात आव्हानांचा सामना करावा लागतो तसाच ती जेव्हा आर्थिक बाजारात प्रवेश करते तेव्हा तिच्यासाठी परिस्थिती मुळीच वेगळी नसते. प्रत्यक्षात कोणत्याही उद्योजकीय कार्यात प्रवेश करताना आणि ते आपल्या व्यवसायात सुरू असताना आव्हाने प्रत्येक टप्प्यावर वाढतात. यात काही शंका नाही की पुरुष उद्योजकांनादेखील आव्हानांचा सामना करावा लागतो परंतु केवळ एक महिला 'किंवा स्त्रीत्व' अशी अनेक आव्हाने निर्माण केली जातात जी महिलापुरते मर्यादित आहेत.

**घरगुती आणि उद्योजक प्रतिबद्धता दरम्यान संघर्ष :** एखाद्या महिलेला सर्वात मोठे आव्हान म्हणजे उद्योजिक कार्यांसह घरगुती काम कसे व्यवस्थापित करावे. एक स्त्री प्रामुख्याने घरगुती कामाची काळजी घेते. तिचे कौटुंबिक जबाबदाऱ्या  तिच्या उद्योजकीय क्रिया करण्यासाठी बहुतेक वेळा अडथळे असतात. तिची मुले व वृद्ध सदस्य आणि संपूर्ण कुटुंबाप्रती असलेली तिच्या जबाबदा्यांमुळे तिला कोणत्याही व्यवसायात व्यस्त राहण्यास खूप कमी वेळ मिळाला. त्यांच्यातील बहुतेक लोक त्यांच्या घरगुती कामाशी तडजोड करू शकत नाहीत म्हणून त्यांच्या आर्थिक कार्यांसह तडजोड करू शकता.

**शिक्षणामध्ये लैंगिक अंतर :** भारतातील बऱ्याच कुटुंबांमध्ये मुली / स्त्रियांकडे जाणे टाळले जाते विविध कारणांमुळे शाळा आणि महाविद्यालये. कुटुंबातील सदस्य येथे त्यांचे शिक्षण थांबवतात पदवीपूर्वी विविध स्तर, अशा प्रकारे उच्च शिक्षणाचा प्रश्न येणार नाही चित्र. शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम आणि इतर अभ्यासक्रमांच्या संयोजनाचा अभाव आहे कोणत्याही उद्योजकीय क्रियाकलाप करण्यासाठी आवश्यक.

**गंभीरपणे घेतले जात नाही :** ज्या स्त्रिया कोणताही व्यवसाय करतात त्यांना गांभीर्याने घेतले जात नाही. तिच्या आसपासच्या लोकांना असे वाटते की तिचा छंद आहे किंवा तिच्या कौटुंबिक कर्तव्यांकरिता कोणताही साइड प्रोजेक्ट आहे. महिलांचे मते आणि सल्ले नेहमीच माणसाच्या मताशी तुलना करता तज्ञ म्हणून पाहिली जात नाहीत. (डॉ. विजयकुमार ए. आणि जयचित्रा एस). बहुतेक वेळा त्यांच्या कल्पनांचा उपहास देखील केला

जातो, कारण ती स्त्री म्हणून जन्माला आली आहे. यामुळे प्रेरणा होते .या लिंगभेद स्त्री उद्योजकासाठी मोठा अडथळा ठरतो.

**सर्वांना संतुष्ट करू इच्छित :** पुरुषप्रधान समाजात, प्रत्येकाच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी आणि त्यांना आनंदी ठेवण्यासाठी महिला नेहमीच समाजीकृत केल्या जातात. ते तडजोड करतात आणि स्वतःला आपल्या समाजाच्या मागणीनुसार समायोजित करतात. त्यांच्यातील बहुतेक महिला त्यांच्या कौशल्यांचा, स्वप्नांचा त्याग करतात.

